म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ९९३८
९८२५

श वन्दे

# काव्योदय ग्रंथमाला

किरण दुसरें



# लताकुञ्ज.

REFBK-0003164
REFBK-0003164

शक,
ळ' दादर, मुंबई.

—:०:—

बलिप्रतिपदा शके १८४७.

काव्योदय ग्रंथमाला, किरण २ रें.

# लताकुञ्ज

३७६४

REFBK-0003164
REFBK-0003164

—प्रकाशक—

कविमित्र-मंडळ, दादर-मुंबई.

बलि प्रतिपदा, शके १८४७ ] किं. ८ आणे. [ आक्टोबर सन १९२५

( सर्व हक्क स्वाधीन )

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठें. |
|---|---|
| १ निवेदन | ३ |
| २ मंगलध्यान | ५ |
| ३ ईशस्तवन | ६ |
| ४ राष्ट्र–मंत्र | ७ |
| ५ मातृभूमिसाठीं— | ८ |
| ६ नवीन गाणें ! | ९ |
| ७ निराश तरुणास— | १० |
| ८ सुप्त समशेरी | ११ |
| ९ सीता–संदेश | १३ |
| १० खरें गाणें | १४ |
| ११ साजणी ! | १५ |
| १२ सुंदरी ! | १७ |
| १३ मनोवांच्छा ! | १८ |
| १४ मौन कां ? | १९ |
| १५ हासरी बालिका ! | २१ |
| १६ बालहृदय | २२ |
| १७ कुसुमास— | २३ |
| १८ भ्रमरास | २५ |
| १९ बुलबुलास— | २६ |
| २० वसंताची मौज ! | २७ |
| २१ कविरायाचें गीत | २९ |
| २२ सत्कविसप्तक | ३० |
| २३ कारंजें व तरुण | ३१ |
| २४ तोरणगड | ३२ |
| २५ मावळे ! | ३५ |
| २६ रणरागिणी | ३६ |
| २७ माझें गाणें | ३७ |
| २८ बेडी | ३८ |
| २९ शियांगचा बंदीवान | ४० |
| ३० पंजरस्थ वनराजास— | ४३ |
| ३१ कालमहिमा ! | ४४ |
| ३२ विधुविलास | ४५ |
| ३३ कालेंच ये नम्रता | ४५ |
| ३४ बालपणाची एक मौज | ४६ |
| ३५ मुरली | ४९ |
| ३६ पंचदर्शी | ५० |
| ३७ मुग्धकवीस | ५२ |
| ३८ उद्धारक | ५४ |
| ३९ साद | ५६ |
| ४० आत्मनिवेदन | ५७ |
| ४१ अंतीं एकच | ५८ |
| ४२ प्रणति ! | ५९ |

# कविमित्र-मंडळाकडे मिळणारीं पुस्तकें.

## मंडळाचीं पुस्तकें.

१ पुष्प-वाटिका. ०-८-०

२ लताकुञ्ज. ०-८-०

## कवि-वसंतविहारकृत

१ जनाचे श्लोक ०-२-०

२ केवळ स्वराज्यासाठीं ०-३-०

३ महिषासुरमथन ०-२-०

४ स्वराज्यबोध ०-६-०

५ आर्यभूमीचा अमीर ०-१-०

६ लोकमान्यतिलक विरह ०-२-०

१ शियांगचा बंदीवान ०-४-०

१ प्रेमबद्ध पराक्रम (कवि कुसुद) ०-४-०

आठ आण्यापेक्षां कमी किंमतीच्या पुस्तकांचीं तेवढीं तिकिटें पाठवावीत. म्हणजे निष्कारण व्ही. पी. खर्च पडणार नाहीं. किंमतीशिवाय ट. ख. निराळा पडेल.

चिटणीस—कविमित्र-मंडळ, दादर-मुंबई.

---

# भारत-कवि-मंडळाचीं पुस्तकें

## विद्वानांनीं व नियतकालिकांनीं वाखाणलेलीं

१ ध्वजः—( दा. ग. कळंबेकर ) प्रतिभासंपन्न राष्ट्रीय काव्य. केसरी म्हणतोः—काव्य विषयानुरूप स्फूर्तिदायक आहे. किं. २ आणे.

२ गंगाजळीः—( वा. वि. वैद्य कापशीकर ) भावनोद्दिपक कवनसंग्रह. केसरी, स्वराज्य, सहविचार, रा. निकेतन इत्यादिकांनीं वाखाणलेला रसाळ, गोड, कोमल भावदर्शक काव्यसंग्रह किं. ४ आणे.

३ स्वनितांजलीः—( छापत आहे ) अनेक प्रसिद्ध कवींच्या उत्कृष्ट स्वनितांचा संग्रह. किं. ४ आणे.

४ प्रेमपरागः—( कळंबेकर वैद्यकृत ) दिव्य प्रेमविषयक नितांतमधुर गीतें. छापत आहेत.

भारत-कवि-मंडळ, कोल्हापूर.

काव्योदय ग्रंथमाला, किरण २ रें.

# लताकुञ्ज

REFBK-0003164

—प्रकाशक—

कविमित्र-मंडळ, दादर-मुंबई.

बलि प्रतिपदा, शके १८४७ ] किं. ८ आणे. [ आक्टोबर सन १९२५

( सर्व हक्क स्वाधीन )

# निवेदन.

## गुरुवर्यांचा मंगल आशीर्वाद

योऽनेकधा हरिहराद्यभिधानरूपः
आत्मानमेव भगवान् विशदीचकार ।
एकः स एव सकलः पुरुषः पुराणः
काव्येषु वोऽपि नवमंगलमातनोतु ॥ १ ॥

महन्मंगल प्रभूच्या कृपेनें आणि गुरुजनांच्या प्रेमळ आशीर्वादानें स्वीकृत कार्यांत पूर्ण यश येऊन आजच्या या सुमंगल प्रसगीं " काव्योदय ग्रंथमाले " च्या दुसऱ्या किरणांत हा " लताकुञ्ज " महाराष्ट्ररसिकांस दाखविण्यास मंडळाला अत्यंत आनंद वाटत आहे.

मंडळानें पहिलें किरण प्रसिद्ध करून आपल्या ध्येयानुसार महाराष्ट्र—शारदेची जी कांहीं यथामति अल्पसेवा केली आहे, त्याबद्दल ज्या थोर व विद्वान् रसिकांनीं आपले मार्मिक अभिप्राय व्यक्त करून मंडळाला कार्यक्षम व उत्साहित करण्याचें श्रेय घेतलें, त्या सर्वांचें मंडळ सदैव ऋणीच राहील.

कांहीं विद्वान् वाङ्मयभक्तांच्या व सन्माननीय मित्रांच्या सूचनेवरून मालेला चिरस्थायी स्वरूप देण्याच्या हेतूनें मंडळाकडून खालील योजना ठरविण्यांत आली आहेः—

**आश्रयदातेः**—२५ रुपये देणारांस मालेचे तहाहयात आश्रयदाते समजण्यांत येऊन मालेचीं सर्व पुस्तकें मोफत देण्यांत येतील. शिवाय प्रत्येक पुस्तकांत आश्रयदाते ह्मणून त्यांचीं नांवेंहि प्रसिद्ध करण्यांत येतील.

**वर्गणीदारः**—१ रुपाया प्रवेश फी भरून मालेचे कायमचे ग्राहक होणारांस मालेचें प्रत्येक पुस्तक पाऊणपट किंमतींत देण्यांत येईल.

तरी सर्व काव्यभक्तांनीं सदर्हु योजनेप्रमाणें हस्तें परहस्तें मंडळाला उदार आश्रय देऊन त्याजकडून उत्तरोत्तर वाढती वाङ्मयसेवा करवून घेण्याचें श्रेय घ्यावें अशी नम्र विनंति आहे.

प्रकाशक—
लक्ष्मण गणेश सुळे,
अध्यक्ष—"कविमित्र-मंडळ" दादर, मुंबई.

काव्योदय ग्रंथमाला, किरण १ लें.

# पुष्प-वाटिका

## उत्कृष्ट कविता-संग्रह

किंमत ८ आठ आणे. टपाल खर्च निराळा.

मुद्रक—
रामचंद्र नारायण मंडलीक,
लोकमान्य छापखाना, गिरगांव-मुंबई.

# निवेदन.

## गुरुवर्यांचा मंगल आशीर्वाद

योऽनेकधा हरिहराद्यभिधानरूपः
आत्मानमेव भगवान् विशदीचकार ।
एकः स एव सकलः पुरुषः पुराणः
काव्येषु वोऽपि नवमंगलमातनोतु ॥ १ ॥

महन्मंगल प्रभूच्या कृपेनें आणि गुरुजनांच्या प्रेमळ आशीर्वादानें स्वीकृत कार्यांत पूर्ण यश येऊन आजच्या या सुमंगल प्रसगीं "काव्योदय ग्रंथमाले" च्या दुसऱ्या किरणांत हा "लताकुञ्ज" महाराष्ट्ररसिकांस दाखविण्यास मंडळाला अत्यंत आनंद वाटत आहे.

मंडळानें पहिलें किरण प्रसिद्ध करून आपल्या ध्येयानुसार महाराष्ट्र-शारदेची जी कांहीं यथामति अल्पसेवा केली आहे, त्याबद्दल ज्या थोर व विद्वान् रसिकांनीं आपले मार्मिक अभिप्राय व्यक्त करून मंडळाला कार्यक्षम व उत्साहित करण्याचें श्रेय घेतलें, त्या सर्वांचें मंडळ सदैव ऋणीच राहील.

कांहीं विद्वान् वाङ्मयभक्तांच्या व सन्माननीय मित्रांच्या सूचनेवरून मालेला चिरस्थायी स्वरूप देण्याच्या हेतूनें मंडळाकडून खालील योजना ठरविण्यांत आली आहेः—

**आश्रयदातेः**—२५ रुपये देणारांस मालेचे तहाहयात आश्रयदाते समजण्यांत येऊन मालेचीं सर्व पुस्तकें मोफत देण्यांत येतील. शिवाय प्रत्येक पुस्तकांत आश्रयदाते ह्मणून त्यांचीं नांवेंहि प्रसिद्ध करण्यांत येतील.

**वर्गणीदारः**—१ रुपाया प्रवेश फी भरून मालेचे कायमचे ग्राहक होणारांस मालेचें प्रत्येक पुस्तक पाऊणपट किंमतींत देण्यांत येईल.

तरी सर्व काव्यभक्तांनीं सदर्हु योजनेप्रमाणें हस्तें परहस्तें मंडळाला उदार आश्रय देऊन त्याजकडून उत्तरोत्तर वाढती वाङ्मयसेवा करवून घेण्याचें श्रेय द्यावें अशी नम्र विनंति आहे.

काव्योदय ग्रंथमालेचें पहिलें किरण " पुष्पवाटिका " या पुस्तकाला इंदूर येथील प्रसिद्ध दानशूर " महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ " यानें २५ रुपयांचें पारितोषक दिलें याबद्दल मंडळ त्यांचें फार फार आभारी आहे.

सदर्हु पुस्तक ता. २२-९-२५ च्या केसरींतील जाहिरातीप्रमाणें विजया दशमीलाच प्रसिद्ध व्हावयाचें, परंतु पुस्तकाच्या छपाईचें काम ज्या प्रेसमध्यें दिलें होतें त्या प्रेसवर अनपेक्षित रीतीनें एकाएकीं भलताच प्रसंग आल्यामुळ आमचें पुस्तक ठरलेल्या दिवशीं प्रसिद्ध होणें अशक्य तर झालेंच; परंतु पुढेंहि किती दिवसांनीं तें आमचे हातीं मिळणार वगैरेबद्दल बरीच अनिश्चितता वाटल्यावरून व निदान अगदीं जवळचा असा आजचा तरी सुमुहूर्त वायां जाऊं नये म्हणून, अत्यंत धांदलीनें व तांतडीनें अगदीं मूळ हस्तलिखित प्रत तयार करण्यापासूनची खटपट करावी लागली. तरी सदर्हु पुस्तक ठरलेल्या वेळीं म्हणजे विजया दशमीला प्रसिद्ध होऊं शकलें नाहीं याबद्दल कोणाचाहि गैरसमज होणार नाहीं अशी आशा आहे.

शेवटीं आपल्या सुबक छपाईनें पुस्तकाच्या अंतर्बाह्य सौंदर्यांत 'लोकमान्य' प्रेसच्या व्यवस्थापकांनीं जी भर घातली त्याबद्दल त्यांचे आभार मानून या लताकुंजांत रसिकांना घटकाभर विश्रांति मिळेल अशी आशा बाळगून हें अल्प निवेदन पुरें करितों.

बलि प्रतिपदा
शके १८४७

रसिकांचा नम्र
लक्ष्मण गणेश सुळे.
अध्यक्ष—" कवि मित्र मंडळ " दादर.

स्थलांतर
म. ग्रं. सं. ठाणे

काव्योदय ग्रंथमाला, किरण दुसरें.

# लताकुञ्ज.



## मंगलध्यान.

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।
या ब्रह्माच्युतशङ्करप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ॥

# ईशस्तवन.

( मार्तंड नारायण आचार्य विरचित )

भक्तैर्भावमयैः सदा सुकृतिभिर्गीतैस्तु यद्गीयते ।
पूतांतःकरणैस्तथा सुमनसा यद्योगिभिर्ध्यायते ।
यत् सर्गस्थितिकारि यत् प्रलयकृद्विश्वस्य बीजं परं ।
वंदे सद्गुरुतत्त्वमद्वयमिदं श्रीवासुदेवाभिधम् ॥ १ ॥

या कुंदेंदुतुषारहारधवलेत्येषा च या वर्णिता ।
यामाश्रित्य कृतार्थतामनुपदं प्राप्ता महासूरयः ।
भक्तानां च सदैव सूपचरिता या मायशोदायिनी ।
तामेते वयमप्यनन्यमनसा वागीश्वरीं धीमहि ॥ २ ॥

वागीश्वरीवरद ! धूर्जटिपुत्र ! देव ! ॥
विघ्नप्रणाशसुभट ! प्रथितप्रभाव ! ॥
मा भूद्विभो वचसि कोऽप्यसदंतरायः ॥
इत्येष ते सुविमलौ चरणौ नमामि ॥ ३ ॥



१८८५



३२८४

# राष्ट्र-मंत्र.




( सूरत मुझे दिखाजा )

हा मंत्र एक आतां ‘ मी हिंदु, हिंदु माझा ’
राष्ट्रास हीच संथा मी हिंदु, हिंदु माझा ॥ ध्रु० ॥
म्हणवी स्वतांस हिंदु तो तो मदीय बंधु
उसळे स्वभावसिंधु मी हिंदु, हिंदु माझा ॥ १ ॥
हा हिंद देश माझा हा हिंदु धर्म माझा
गीतांत गीत राजा मी हिंदु, हिंदु माझा ॥ २ ॥
वेद प्रबंध माझा जनकादिवृंद माझा
श्री रामचंद्र माझा मी हिंदु, हिंदु माझा ॥ ३ ॥
मथुरेश कृष्ण माझा गीता जयार्क माझा
तो धर्म पांडवांचा मी हिंदु, हिंदु माझा ॥ ४ ॥
दाही दिशांसि ज्याचा शौर्यें पुरा दरारा
भाग्यांत वाढणारा तो हिंदु धर्म माझा ॥ ५ ॥
पृथुराज सिंह माझा राणा प्रताप माझा
माझा शिवाजि राजा ज्या हिंद, हिंदु माझा ॥ ६ ॥
समतेमधें पहावें ऐक्यामधें रहावें
स्वातंत्र्य पूर्ण गावें मी हिंदु, हिंदु माझा ॥ ७ ॥
दत्तात्रयात्मजाची अन्या विनंति कैंची
बोला सदैव हेंची ‘मी हिंदु, हिंदु माझा’ ॥ ८ ॥

दादर १८-८-२५. —“ वसंतविहार ”

# मायभूमिसाठीं.

( रसने न राघवाच्या )

देवीं जरी तुझ्या ये दारिद्र्य मूर्तिमंत !
पर्वा जरी न तुझी दरबारिं वा जनांत !
विषमा परिस्थितीचें शिरिं खड्ग टांगलेलें
पदिं पारतंत्र्यरूपी बेडी जरी खळाळे
मर्दा ! तरी तुझी ती तरवील छाति तूतें
स्वर्गीय भाग्य तुजला लाधेल राजसा ! तें
येईल घेउनीयां माला करीं जयश्री
येईल चालुनीयां पायीं तुझ्या स्वयें श्री
गगनांत देव जमुनी करितील पुष्प-वृष्टि
वैकुंठ वैभवाला पावेल हीच सृष्टि
तो मोक्ष दूर कुठला ? परि मायभूमिसाठीं—
सर्वस्व होमुनियां हो सिद्ध तूं मराया !

मुंबई. —विपिनविहारी.

# नवीन गाणें !

( पद )

गावें कोणतें ? गाणें नविनसें ॥

रमणीवल्लभ प्रेमकूजनीं ।
लतामंडपीं विहार करुनी ।
स्वर्गंगेच्या वर्षावांतुनी ।
मधुरा सेविती । ऐसें गाउं कां ?
ना तर गावें कोणतें ? गाणें नविनसें ॥

२

ईशस्तवनीं लीन होउनी ।
सद्‌गुरुचरणीं शरण रिघुनी ।
मोक्षप्राप्तीचा मार्ग सेवुनी ।
देहा उद्धरा । ऐसें गाउं कां ?
ना तर गावें कोणतें ? गाणें नविनसें ॥

३

शास्त्र ग्रंथ व्यासंग उच्च हा ।
यावज्जीवन चित्तीं सेवा ।
तत्त्ववाद निर्णया लावितां ।
विद्या सेवितां । ऐसें गाउं कां ?
ना तर गावें कोणतें ? गाणें नविनसें ॥

४

छे, छे, न लगे तें मज कांहीं ।
त्या योगेंही मुक्ती नाहीं ।
खटाटोप तो व्यर्थाचे जाई ।
देशोद्धारणीं । ऐसें गाउं द्या ।
ना तर दुसरें कोणतें ? गाणें नविनसें ॥

५

पारतंत्र्यपंकांतुनि सुटणें ।
युद्धसंगरीं देह अर्पिणें ।
सत्याग्रह * होमा प्रज्वलणें ।
देशोद्धारणीं । ऐसें गातसें ।
या जगतीं ना अन्यसें । गाणें नविनसें ।।

—कुमुद.

---

# निराश तरुणांस—

बाल्याच्या कुरणांमधूनि नुकता येशी भवाब्धीतसीं-
तींची कां तव चित्त व्याकुल गमे? कां ये मुखीं म्लानता?
वाघाचा जबडा चिरून बघण्या ज्वानी असे; हिंपुटी-
कां होसी? बघ हा समुद्र सगळा उल्लंघिण्याचा असे!
धाष्टर्यें मंत्रवुनी विभूति झटकीं नैराश्यभूतावरी!
बांधीं कंबर सोड भीति अवघी विक्राळ वाऱ्यावरी!
"जें दैवीं लिहिलें-घडेल" वदसी, तें दैव आहे कुठें?
व्योमीं स्वग नसे; तुझ्याच जवळी आहे-स्वयेंची पहा!
घे बांधून शिदोरि, मार्गी न मिळे कांहींहि भक्षावया!
हाकारीं मग तारुं नीट अपुलें उत्तुंग लाटावरी!
चोरांसी खडकादि ओळखुनि बा! मारीं वल्हीं कौशलें-
जाशी पैलतिरा; परी मनिं सदा चिंतीत जा पाठ हा—
आशा शीड नसे तरी कशि तरी तारून तूतें तरे?
"आशा तंतुविना ध्वनी न निघतो वाद्यांतुनी—हें खरें! ॥ १ ॥

माहीम ना. पां. फडके बी. ए. (नॅशनल)

---

* श्रीहरीचा अद्वैत सत्याग्रह.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. क्रा. नं. ७८२
नं. २७१५५
ठाणे.

# सुप्त समशेरी.

( बंजारा )

गगनांत गर्जता भेरी
म्यानांत सुप्त समशेरी ॥ धृ० ॥
रविबिंब उदित सोनेरी
हतबलास निद्रा घेरी
आरंभ कुठें कार्याला ?
त्यजिलें न अझुनि शयनाला
नच आळस सोडि जनाला
मग दूर जयश्रीमाला
उभविली सुरेख हवेली
स्वप्नांत करामत केली ॥ १ ॥
ठाकला उषा दाराशीं
घालिती गस्त रहिवासी
चैतन्य दहाहि दिशांशीं
जन निद्रित हाय उपाशी
कोठारें लुटिलीं गेलीं
भांडारें निर्धन झालीं
शत्रूंची स्वारी आली
तजवीज न आधीं केली
वाजती रिपूंच्या भेरी
आमुच्या सुप्त समशेरी ॥ २ ॥

गिळियलें कमळ भुंग्यांनीं
लुटियला सिंह कोल्ह्यांनीं
झांकिला सूर्य जलदांनीं
सृष्टीची उलट कहाणी
    लक्ष्मीवर आला डल्ला
    पावित्र्यावरती हल्ला
    रिपुकडे उसळला गिल्ला
    आपसांत एकच कल्ला
संगरीं गर्जल्या भेरी
म्यानांत सुप्त समशेरी ।। ३ ।।
हे रिपू गडाशीं आले
ते पहा सुरुंग उडाले
भूकंप—निनाद निघाले
शांततेंत वादळ झालें
    गड जात शत्रुच्या हाता
    हिंदुत्व होत नापत्ता
    धर्मास पारखे होतां
    ही कसली निद्रा घेतां ?
दत्तात्रयसूनु विचारी
चमकती कधीं समशेरी ? ।। ४ ।।

दादर २७-९-२३. "वसन्तविहार"

# सीता-संदेश.

( श्लोक )

कांतारीं त्यजुनि नृपानुशासनानें ।
भूतार्थी तिज वदतांच लक्ष्मणानें ।
भूकन्या निहत कुदैव—वज्रघातीं ।
क्रंदे ती विकल मृगीसमा वनांतीं ॥ १ ॥
शोकानें रडवुनि वन्य पक्षिजातां ।
पाषाणीं नवमृदुतेस दे समार्ता ।
संक्षोभें हृदय तुटे सद्गदोक्ति ।
वैदेही निजपतिबंधुतें वदे ती ॥ २ ॥
वत्सा निरोप मम हा नृपतीस सांगें ।
जी त्वत्समक्ष गतदूषण वन्हिसंगें ।
लोकापवादिंच तिला त्यजिलें वनांतीं ।
ती हीच काय निपुणा तव राजनीति ? ॥ ३ ॥
मदंतरीं हें नसतें त्वदीय ।
सत्तेज नाथा जरि अंतराय ।
मी काय ऐशा अतुलापमानी ।
जावास या पोष्यविशेष मानी ? ॥ ४ ॥
कां दूषवावें अथवा तुला मी ।
तूं काय हा ! तामस मार्गगामी ।
विवेक सोडूनि कधीं कसेंही ।
तूं स्वार्थ मोहें करिशील कांहीं ॥ ५ ॥
तूं कामचार बनुनी करिशील कांहीं ।
कोणा कसें रघुपते वदवे असेंही ।

हा घोर वज्रपतनासम दैवघात ।
माझेंच कीं खचित संचित मूर्तिमंत ॥ ६ ॥

मांगल्य तें तव विचारपरंपरेचें ।
ठावें कुणा न कुलभूषण सांग साचें ।
तें आवडो मज, रुचे तव जें मतातें ।
तें सौख्यकारि मज, जें तुज सौख्य देतें ॥ ७ ॥

क्लेशांतें सहन करीन काननांतीं ।
चिंतोनी विमल तुझीं पदांबुजें तीं ।
भूपेंद्रा ! परि पुरवींच एक अंतीं ।
माझी ही—पदिं करितें तुझ्या—विनंति ॥ ८ ॥

आतां न मी जरि नृपा ! तव धर्मजाया ।
मातें तपस्विसम मान्य गणींच राया ।
हें तोषवील इतुकेंहि मदंतरा या ।
ऐसें वदोनि विरमे रघुराज—जाया ॥ ९ ॥

लोकाराधन साध्य एक गणुनी प्राणप्रियेतें त्यजी ।
तो राजा रघुनाथ एक, न अशी झाली विभूती दुजी ।
देवी ती जनकात्मजाहि अतुला ! मद्बंधुहो ! आदरा ।
सीमा संस्कृतिची स्वकीय नमुनी तें पूर्व कांहीं स्मरा ॥ १० ॥

नाडसूर. —मा. ना. आचार्य.

---

## खरें गाणें.

गाणें तेंच खरें गाणें
गुणगुणुनी गुंगुनि जाणें
त्याविण कांहीं ना सुचणें
गाणें गाणें गमे जिणें

फिरुनी फिरुनी त्या गाणें
गाणें ना कधीं विसंबणें
लागेना कांहीं गोड
गाण्याचें एकच वेड
हृदयावरि तें पूर्ण ठसे
गाण्याविण जग शून्य दिसे
शिणल्या जीवा
थकल्या भावा
नित्य नवनवा
देत विसावा जे गाणें
तेंच खरें वाटे गाणें ॥ १ ॥

दादर—मुंबई —वनराज.

---

## साजणी !

( एक रणविजयी नृपवीर आपल्या भावी साजणीस म्हणतो:—)

रण तुमुल करुनि जय लाधे
तुजवीण पराभव भासे—साजणी !
शतविजयसुमांची माला
कुर्बान करिन तुजवरुनी—मानिनी !
प्रकृतीविना पुरुषाचें
चालेल कसें संसारीं—रुक्ष या ?
तूं जरि
नाहिं मज तरी
जगुनि भूवरी
लाभ कसला गे ? लाभ कसला गे ?
बिजलीविण मेघ जसा गे—साजणी ॥ १ ॥

वीरांचा असतां काळ
        तुजपुढेंच झालों लीन—भामिनी !
रवि असुनि चंद्रचि झालों
        तवहृदनुराग फुलवाया—कुमुदिनी !
हा गुणनिधि उलटुनि आला
        तुज नदीस भेटायातें—साजणी !
            नृपशिरें
                झिजवुनी हिरे
                    याच नरवरें—
नमविलीं पायीं ! नमविलीं पायीं—
        याची तव भिक्षांदेही—साजणी ! ॥ २ ॥
नद वाहिले रुधिराचे
        तव कुंकुमतिलकें मोह—मन्मना !
घनदाट तमा नच भ्यालों
        तव केशकुंजि परि खेळे—जीव हा !
चुरगळुनि भक्षिले हुरडे
        अधरामृतपाना सखये !—लोभलों
किटले रणघोषें कान
        मधुवचन ऐकण्या झाले—आतुर !
अंबरीं उडति बहु गोळे
        तव कपोलबिंदू मजला—हरुनि घे !
            वपु बळें
                शरीं विंधिलें !
                    सर्व साहिलें !
परी मत्प्राण—परी मत्प्राण
आकर्षी तव दृग्बाण !—साजणी ! ॥ ३ ॥

करपाशसुखास्तव तुझिया
लोटले दूर यमपाश—संगरीं !
पाजुनी पाणि शत्रूला
तव पाणिग्रहणा आलों—दौडुनी !
हिंडलों दऱ्याखोऱ्यांत
मानसीं परि तव मूर्ती—स्वामिनी !
चंद्रास कौमुदी नसती
अज्ञात कुठेंही लपता—जाउनी !
नंदलाल राधेवाण
किती कृतार्थ होता सांग ?—कामिनी !
यतिला न सुभद्रा मिळती
तो यतीच विपिनिं रहाता—होउनी
तुजवीण
वाटतें शून्य !
तुझ्यासह धन्य—
करिन ही धरणि—करिन ही धरणी
ना तरि यति जाइन बनुनी !—साजणी ! ! ॥ ४ ॥

माहीम —ना. पां. फडके, बी. ए. ( नॅशनल )

---

# सुंदरी

( शार्दूलविक्रीडित )

स्नेहें गुंतविलें मनास मम कीं वात्सल्य दावोनियां
गेलें शैशव तें; तशीच ममता अव्यग्र मातेवरी
झालों थोर, सखे, रमे सहचरा संगेंहि नानापरी
ताटातूट घडेचि कंठ भरला मित्रास देखोनियां ॥ १ ॥

विद्यामग्न मनास अन्य न रुचे वाटे तया अंतरीं
घालावें चिर आयु, सौख्यद दुजें कांहीं दिसेना जगीं
घालों सेवुनि ज्ञान तों न पुढतीं लागे मनाला धगी
गेले उच्च कुठें मनोरथ; कशी येई दशा ही परी ! ॥ २ ॥

केलें ताडन जों स्मरें विकल तो गेला करोनी मना
झालों अंकित तेधवां बघुनियां तेजस्वि नेत्रां तव
भंगे प्रेम जरा न तें सुदृढही होईच संगोद्भव
त्यांतें स्थैर्य दिलें तुवां विमल ही बिंबे हृदीं भावना ॥ ३ ॥

तेव्हां कोमल भाव जे विहरले माझे मनोमंदिरीं
कालाचें भय तें मुळीं न उरलें त्यांना अतां सुंदरी !

मुंबई —वि. ह. देशपांडे, बी. ए.

---

# मनोवांच्छा !

[ शार्दूलविक्रीडित ]

कोणी एक सती विनोद-चतुरा, मुग्धा, नवोढा अहा !
लावण्यें विलसे शुभांगि; पतिची मार्गप्रतीक्षा करी,
तों देखे मुख-चंद्रमा म्हणुनि कां हांसे अशी कौमुदी ?
हांसोनी हंसवी, प्रियास रमवी; प्रेमें पुसोनी सती ॥ १ ॥

कोणाचें तरि बाळ खेळत पुढें त्या घे कडे सत्वरी
सौंदर्यें नटलें बघूनि सहजीं आनंद दाटे मनीं
प्रेमानें अवलोकुनी पतिकडे पाही तसें बाळ तें
हेतू पूर्ण धरून एक हृदयीं घेई मुके कौतुकें ॥ २ ॥

दोघांच्या नजरा भिडोनि वळती बाळाकडे कासया ?
दोघेंही बघती परस्पर किती आशा धरोनी तया

त्यांच्या भाव मनांतला समजुनी प्रार्थी कवी मानसीं
विश्वेशा ! करिं हेतु पूर्ण मनचा; तूं त्यांचिया जाणिशी ॥ ३ ॥

दादर-मुंबई —वनराज.

---

# मौन कां ?

( गझल् )

पूर्वींचीं वचनें तुझीं तीं
फोल कां घन गर्जले ?
कोप कां इतुका तुला हा ?
नामही मम वर्जिलें ! १

ना तुझें मज पत्र एकही वा निरोपहि तो तरी
भेट मग ती दूर राहो हाय झुरणी अंतरीं ! २
कां स्मृतीचें चित्र झालें जीर्ण ओळखतां नये ?
प्रेमभावा माझिया कां ठाव नाहीं त्या दये ? ३

काय विटलें चित्त भावुनि
दीनजन सहवास हा !
लागली गोडी तुला कीं
त्या परधामीं अहा ! ४

मित्र म्हणुनी कां दगा अर्ध्या पथीं दिधला मला
बाण विषमय ताप नच दे शब्द हृदया लागला ५
चित्त माझें हें खुळें तुझिया छबीला काढितें
अश्रुमौक्तिक माळ गुंफुनि कंठिं हांसत घालतें ६

नेत्र माझे अंतरींचे
त्याच नेत्रां पाहती

आपपर या भावनेला
दूर सोडुनि राहती ७

पाहसी तूं चित्र ऐसें या स्वरूपाचें कधीं ?
सांग माझ्या हृदयमित्रा ! तार अथवा या वधीं ८
शोधशोधित धाम तूझें मी जरी यावें जवें
काळजी वदशील वा नच मंजु या जीवासवें ९

मी जपावा मंत्र तूझा
भान त्याचें ना तुला
त्वां असावें दग विभवीं
बोल शिकवित बुल्बुला १०

साम्यता जरि ना धनाची जाणशिल कां मन्मना
अब्धिच्या लहरी खळाळति या जिवाच्या कल्पना ! ११
काय सांगूं स्वानुभव कां पूर्ण झाली वंचना
लोहपण ये पूर्ण कसल्या जर्द पिवळ्या कांचना ! १२

जीविताच्या जातिची ही
वेल सुकुनी जातसे
लागली हुरहूर जीवा
येतसे वा जातसे ! १३

हो चकोरा चंद्रिकेविण दुःखदायी शर्वरी
चक्रवाका चांदण्यांची काय शोभा अंबरीं १४
सख्य तें गंगोदकापरि आजला यमुनाजल
सांग कां अपराध झाला बोल माझे प्रांजल १५

ठाउकें न सुवर्ण—देहीं
लोहचित्त विराजलें
ह्या " वसन्तविहार " हृदया
तोषवी यश गाजलें १६

दादर २५।६।२३ —वसंतविहार

७९६४

# हांसरी बालिका !

[ एका ३।४ वर्षांच्या बालिकेस निष्कारण हंसतांना पाहून सुचलेले विचार ]

—साकी—

रुचिर बालिके ! मोददायके ! नयनसुभगतनु सुमंगले !
तव मधुहास्यसुधावृष्टिनें हृष्ट मला केलें !
विश्वाच्या मांगल्याचें प्रतिबिंब उमटलें सुकोमले !
मूर्त ब्रम्हाचि नर्तन करि तव हास्यीं वा बाले !
सुभग शुभद ही आशादेवी सजली जणुं बाल्यीं तुझिया
सात्विक आनंदाचा ठेवा विलसत कीं, मुखिं या !
सौख्यसार सर्वस्वचि झालें सम्मीलित त्वन्मुखांतरीं
पीयूषाचे तुषार जणुं हे झळकति लोचन बहुतपरी !
मधुहास्याची मधुलास्याची झंकृति तव मम हृदंतरीं
हर्षोर्मींचे प्रेमोर्मींचे उठाव उठवी विविधपरी !
गोंडस बाले ! विराजते जणुं बांसरि बोबडि मुखावरी
अमृतगर्वहर मधुरवचावलि रागदारि ती छेडि बरी !
सरसवाक्सुधानिष्यंदी कविची वा कोकिळेची
वाणी प्रिय नच तुझ्या सुमंजुल वचांहुनी साची !
आनंदाचीं सुमनें उधळिशि इतस्ततः या मधुहास्यें
*'सुमन' बालिके ! मृदुतनु-लतिके ! नूतनकमलास्ये !
शांत करिशि तूं श्रांत मन्मना मधुबाले ! मधुहास्यभरें
हांस गडे ! तर हांसुनि हसवी विश्वाहि एकसरें ! !

पाली ( सुधागड ) —विपिनविहारी

---

* त्या मुलीचें नांव.

# बालहृदय !

[ कथासूत्रः—१०-१२ वर्षांचा राजकुमार अजय आणि त्याचे पित्यानें पालन केलेली ग्वाल्हेराधिपाची मातृपितृविहीन कन्या हिरण्मयी हीं दोघें संध्याकाळीं गडावरील एका टोंकाला फिरत असतांना हिरण्मयीचा राघू अजयाचे हातांतून उडून गेला. प्रस्तुत उतारा बाबू नंदिलाल बंदोपाध्याय यांच्या एका वंगीय उपन्यासाच्या आधारें लिहिलेल्या " हिरण्मयी " या खंडकाव्यांतील आहे. ]

—चंद्रकांत—

" जा मी नाहीं बोलत तुजशी यावेळीं अजया ।
उडविलास ना राघू माझा हातीं घेउनियां ! "
कृतकरोषें सोडुनी कराला दूर होइ बाला
धरुनि उभयकरिं बाल तियेला लडिवाळें वदला
" धरुनि तुझा तुज देइन रागवुं नको गडे ! पण तूं
होता कां वद खरेंच माझा गे ! तसला हेतू ? "
"—पण जातां मी पिंजऱ्यांतली ती माझी मैना
पाख पाखडिल आरडुनी जर राघू दिसला ना
आणिक अजया ! डाळिंबाच्या दाण्यांचा नुकती
देवघेव ती करूं लागली चोंचींतुनि होती
आधिंच होती फडफडवित पर इकडे येतांनां
जीव तोडुनी पाख पाखडिल आतां राघुविना
हाय ! राघु मज मिळेल मज कां " गहिंवरली बाला
" नको रडुं गडे ! " वदे बाल " बघ धरितों क्षणें याला "
तीरासमान बाल जाइ तो धांवत तरुपाशीं
तों जाई उडुनी तो राघू पर्वतशिखराशीं
वदे वळुनि मागुती " हिरण ! तूं थांब जरा तेथें
कड्यावरुनिही या जाउनि मी धरितों बघ यातें "

“ नको नको मज राघू अजया ? नको गडे जाऊं
किती उंच तो डोंगर —” लागे ती थरथर कांपूं —
“ आणि वाहते आहे खालीं दरींत खोल नदी
नकोग बाई ! नको राघु मज फिर मागें आधीं ! ”

आणि जाउनी गळ्यांत घालुनि कर “ गृहिं चल ” बोले
“ झाली संध्याकाळ बघ रवी अस्ताला चाले ! ”
चिमण्या हनुला धरुनि तिच्या मग चिमण्या हस्तानें
वदे “ न बघशिल ना मजशीं त्या नसत्या रागानें ? ”

“ राग कशाचा आणिक अजया ! तुजवरि मजकडुनी
स्मरतें कां तुज सांग बरें कधिं झाला तरि चुकुनी ?
काय न करितें तुजसाठीं मी ? करिन न कां आतां ?
राघूची ती काय कथा ?—तूं माझा आवडता ! ”

* * * *

कटु जगतींचे पापविकार न शिवति बालहृदया
खचित बालियच्या सुखा न उपमा ती शोधूं गेल्या !

—विपिनविहारी

टाणें

---

# कुसुमास—

( अर्ध तनू वारुळीं बुडाली० )

प्रभात काळीं रम्य निकुञ्जीं सुमनवरा प्रेमला
असे अवतार तुझा जाहला ॥ १ ॥

हसतीं डुलतीं नभीं खेळतीं नक्षत्रें जीं निशीं
विधीनें पीयूषसम तद्रसीं ॥ २ ॥

सृष्टि सतीच्या सौंदर्याचा रुचिर अर्क मिळवुनी
निर्मिला काय तनु मोहिनी ॥ ३ ॥

यत्सहवासें मंगलमय हें अखिल विश्व जाहलें
उषेनें त्या तुज संगोपिलें ॥ ४ ॥
मातेसम तव लालन पालन प्रथम उषा सुंदरी
धरुनि करि प्रेम छत्र तव शिरीं ॥ ५ ॥
भीत भीत हा मंद समीरण येउनि नव किसलयीं
बैसुनी प्रेमें तुज जोजवी ॥ ६ ॥
हर्ष निर्भरें खगगण गाई अंगाई बहु परी
वंश- तरु -पवन साथ त्या करी ॥ ७ ॥
चित्‌ब्रह्माचा अंश सूर्य हा उदयाचलिं येउनी
जातसे तव दर्शानें मोहुनी ॥ ८ ॥
मृदुल तनू तव गोचर होतां हेलावुनि अंतरीं
वितरि कर कोमल वसुधेवरी ॥ ९ ॥
सृष्टि सतीची राजस विमणी फूल पांखरें तुला
येतां भेटाया प्रेमला ॥ १० ॥
स्वागत करुनी तयास करिशी तुष्ट सुरस अर्पुनी
सुसंगति जगतिं सुफलदायिनी ॥ ११ ॥
मृदुल लतेच्याकडे बैसुनी रुचिर हास्य वितरिसी
स्मितें त्या सकल विश्व मोहिसी ॥ १२ ॥
तव स्मिताची शरच्चंद्रिका विलसतांचि महिवरी
तुष्टती अणुरेणू स्वांतरीं ॥ १३ ॥
प्रभुरायानें तुला निर्मिलें काय जगा हसविण्या ?
अथवा तुष्ट मनें रिझविण्या ॥ १४ ॥
विहगवृंद हा मधुर निनादें व्योम भाग भरितसे
छेः ! तव यशोगीत गातसे ॥ १५ ॥
सुगंधरूपें विमल कीर्ति तव समीर हा निशिदिनीं
पसरुनी टाकि जगत् व्यापुनी ॥ १६ ॥

काव्यदेविचे परमभक्त कविराय तुझी गुणतती
प्रेमें मधुर वचें वर्णिती ॥ १७ ॥
मधुर सुगंधें दरवळणाऱ्या सुमनवश प्रेमला
अर्पितों कवन हार हा तुला ॥ १८ ॥

पणदरें		—कृष्ण सुमंत.

---

# भ्रमरास—

भ्रांतिग्रासम कासया अलिवरा ! कुंजांतरीं हिंडसी ?
भीति व्याकुल दृष्टि कां थरथरा त्वत्पक्ष रे कांपती ?
सृष्टीची लपलीं गुजें नुमगती कां तूजशीं संप्रती
कां ऐसा प्रतिभा-विहीन-कविसा उद्विग्न तूं भासशी ॥ १ ॥
आनंदैकनिधान निर्झर-सुखाचा तूंच चेतोहरा
नाहीं ठाउक दुःख काय म्हणुना त्वन्मानसा अल्पहीं
वाहे मंजुल गुंजनीं तव सुधा-निष्यंद तेणें मही
भृंगा कां नच न्हाणिशी ? समयिं या कां होसि चिंतातुर ? ॥२॥
सद्भाग्यें कवि या पदास चढले जे सर्वही ते तुला
आलेख्यीं स्तवुनी चिरायु करिती त्वद्वैभवा वर्णुन
त्यांची संगत मंगला हरपतां कीं कायरे प्रेमला
झाला तूं हतबुद्ध ? तोंच बदला तो भृंग निश्वासुन—॥ ३ ॥
गेली होउनि मत्सखी कमलिनी संशुष्क तेणें मला
झालें नीरस दुःख पूर्ण अवघें निष्प्रेम हें जीवन

पणदरें		—कृष्णसुमंत

---

# बुल्बुलास—

( चा० सेनागति )

असासि गायकीं भला !—गाच बुल्बुला !
व्यथित मानसीं कुणी
वदत तुजसि टोंचुनी !
धरुनि काय तें मनीं ?—मूक ठाकला ? ॥ १ ॥
जन असेच चालती
गुणनया न देखती
अनयिं घोर लोळती—छळिती ते तुला ! ॥ २ ॥
रुदन योग्य दुःखिता—
रुचिर मोद सुस्थिता !
परि तयांत एकता—भासते तुला ! ॥ ३ ॥
किती सतार छेडिली
कटुसुरांत बोलली !
त्वत्समान ऐकिली—तान कोमला ! ॥ ४ ॥
असुख-सौख्यि साम्यता—
कवण तुजसि दाविता ?
हृदयगोप्यिची कथा—बोधिं गा मला ! ॥ ५ ॥
नर सुधी जगीं दिसे
उचित व्यय तिचा नसे !
बघुनि चित्त भ्रमतसे ?—काय प्रेमला ? ॥ ६ ॥
तव सुरम्य गायनीं
रमत स्फूर्ति लोभुनी
कवन गोड गाउनी—उधाळिं गा तिला ! ॥ ७ ॥

जनपदीं न राहसी
विपिनें काल कंठिसी !
फुकट बोल ओपिसी—हरुनियां बला ? ॥ ८ ॥
तुजसि वेड लागलें
वदति लोक ते भले !
परि दुजेंच आढळे—त्यामधें मला ! ॥ ९ ॥
जरि असेल वेड तें
लव न वाण दिव्यते !
झुलविन मी सृष्टि; तें—लाभतां मला ! ! ॥ १० ॥

माहीम ना. पां. फडके, बी. ए. ( नॅशनल )

## वसन्ताची मौज.

( रसने न राघवाच्या० )

रसिकां विलास दावी ये ये वसंतराया
तूं एक भाग्यशाली लीला नव्या पहाया ॥ धृ० ॥
फुलले रसाळ नामी फुलल्या लता विलोला
इतरां तरूंस लागे नव पालवी दिसाया १
कुंजांत गुंजनांच्या मधु मंजु मंजु लहरी
भृंगावली निघाली मकरंदलाभ घ्याया २
आमोदमोद सारा भरला दिगंतराळीं
वसुधा खुल्या दिलानें लागे मुदें डुलाया ३
चंद्राचिया विमानीं रतिकांत सज्ज झाला
फिरतीवरी निघाली स्वारी मजा लुटाया ४

फेंकी वरूनि अभ्रें — जिंकी मनें जनांचीं  
हुरहूर ठेवुनियां — लावी पहा झुराया ५

स्वर्लोक रंगलेला — वसुधाहि रंगलेली  
जलसे सुरू जहाले — भर कोकिळांस गाया ६

स्तुतिपाठ भाट गाती — द्विजराज भाग घेती  
ध्वनि ये दहा दिशांनीं — आला वसंतराया ७

चाहूल पाउलांची — येतांचि राजसा हे  
आतूर चंद्रिका हो — हृदयीं तुला धराया ८

नजरेंत जादु तूझ्या — जें जें तुवां पहावें  
गुलजार होत तें तें — किमया न ये वदाया ९

पाहोनि रूप तूझें — लक्ष्मी तुझीच झाली  
राजाधिराज तूंतें — लागे अहा पुजाया १०

कांहीं नव्या मनांनीं — दुजिया नव्या मनाशीं  
पण सावधान केला — संसार रंगवाया ११

उल्हास हा फुलेला — आशा विकास पाही  
उत्साह हर्षशाली — मति लागली रमाया १२

जड जंगमांत आतां — चाले वसंतलीला  
इंद्रादि देव आले — भूमंडळा पहाया १३

आधार तूं दयेचा — माहेर तूं सुखाचें  
संजीवनी जिवाला — जगतांत या जगाया १४

योगी तसे महात्मे — स्वर्लोकिं राहणारे  
भूलोकीं देहधारी — येती मजा पहाया १५

त्वत्स्वागतार्थ नाथा — सजल्या दिगंगना या  
त्या स्रग्धरा सुगंधी — सुमनें तुला वहाया १६

कधिं अंबुजासवें तूं — कधिं आम्रमंजरीशीं  
सलगी सुखें करावी — क्रीडा तुझ्या अशा या १७

सरितोचिया प्रवाहीं काधिं अंबुधी जलांत
स्नानें मुदें करावीं लीला तुझ्या अशा या १८
मलयाद्रिशृंगें खेळे अथवा हिमालयीं त्या
घेऊनि सौरभाला लागे समीर पायां १९
ऐने महाल झाला कैलास शैल सारा
लागे गजांत लक्ष्मी निजरूप ती पहाया २०
हृदयांत गूढगीता तूं जन्म गुप्त देसी
मग लाविसी जगा या संगीत ऐकवाया २१
संगीत ते फवारे उडती सहस्त्रधारा
वसुधा सुधाभिषिक्ता पाही वसंतराया ! २२
आत्मज्योति परंधामें—बोध केला तसें लिही
“ वसंतविहार ” वदे—वसंताचीच मौज ही २३

दादर. —वसंतविहार.

---

# कविरायाचें गीत !

( भूपतिवैभव )

हें गीत अहा ! कविरायाचें हें गीत !
ही विश्वविमोहक जादू भरली यांत ! !
कमनीय उषा वा याच्या हृदयिं उदेली
स्मितमुखि ती या मधुगानिं रंगरस उधळी !
कीं, हृदयीं याच्या संध्या हर्षित झाली
ही प्रणयरंजिता मनोज्ञ सुषमा ल्याली !
यन्मनोवितानीं रम्य चंद्रिका खुलली
करवर्षी ईषत्स्मितपूर्वक ही खालीं !
कविहृदयोद्यानीं प्रीतिलता वा फुलली

उधळिते फुलें हीं हर्षनिर्भरा झाली !
कीं वासंतिक वनलक्ष्मि मूर्त अवतरलीं
सोडिते नयनशर हंसुनी किंचित् गालीं !
कविहृदयनिकुञ्जीं दिव्य विणेच्या तारा
कीं छेडित कविता प्रणयानिर्भरा मधुरा !
वचकल्पत्रतता कुसुमित वाही होई
कविहृदयनंदनोद्यानीं बहरा येई !
हा वर्ष सुधेचा कीं हीं याचीं गीतें !
कीं आणि भूवरी स्वरप्सरासंगीतें ! !

मुंबई. —विपिनविहारी.

## सत्कविसप्तक.

( श्लोक )

सुशब्दकाव्यीं रमवी कुणी तो ।
सदर्थ दानें कुणि मोहवीतो ।
हीं दोनही साध्य जया बुधातें ।
तो भूषवी सत्कवि या पदातें ।। १ ।।

विनोदकारी न वदेल फार ।
शृंगारिंही फार न ठेवि भार ।
न कूटकाव्यीं श्रमवी मतीतें ।
तो भूषवीं सत्कवि या पदातें ।। २ ।।

उदात्त तें वीरचरित्र कांहीं ।
निसर्गीचें निर्मित रम्य तेंही ।
वानील किंवा विभुच्या यशातें ।
तो भूषवी सत्कवि या पदातें ।। ३ ।।

उत्प्रेक्षेना व्यर्थ अगम्य कांहीं ।
सलील अर्थीं नवलास पाही ।
तद्वर्णनीं दावि चमत्कृतीतें ।
तो भूषवी सत्कवि या पदातें ॥ ४ ॥
पदीं पदीं पोषुनियां रसातें ।
रसानुकूलें नवशब्दजातें ।
प्रफुल्लवी सत्कृतिसारसातें ।
तो भूषवी सत्कवि या पदातें ॥ ५ ॥
अक्लेशगम्यार्थसमर्थसत्पदीं ।
सद्भावना वागवुनी पदोपदीं ।
प्रवर्तवी जो रसवाहिनीतें ।
तो भूषवी सत्कवि या पदातें ॥ ६ ॥
तादात्म्य-शक्ति-प्रतिकर्ष-साधनीं ।
यथार्थ जो वर्ण्य विशेष वर्णुनी ।
तद्रूपता दे रसिकांतरातें ।
तो भूषवी सत्कवि या पदातें ॥ ७ ॥

नाडसूर —मा० ना० आचार्य.

---

# कारंजें व तरूण.

—:०:—

कारंजाची उंच भरारी । फिरते जेथें वारा भारी
क्षणांत वरती क्षणांत भंवती । निर्मल मौक्तिक तुषार उडती
तुषार करिती थंड जिवांना । उत्साहानें घेई ताना
चैतन्यानें भरला राणा । तरूण पेटे तो अभिमाना
उत्साहाची प्रचंड शक्ति । उपजविते ती अलोट भक्ति—

तरुण जनांच्या अंतःकरणीं; । जन्मभूमिच्या लागे चरणीं
वडील झुलुनी त्यास मोहिती । कर्मच्युत त्या करूं पाहती
स्वैरगतीनें परि फिरणारा । वात न देई त्यांना थारा
मेघें जरि तें व्योम व्यापिलें । सूर्याचें कां तेज लोपलें ?
परवशतेची बेडी पडली । शूरत्वाची होळी झाली
हातांमधलीं शस्त्रें गेलीं । ओळख त्यांची मुळीं न उरली
नांव काढितां दचकी भरली । दुर्बलतेची कमाल झाली !
सुवर्णभूमी दीन जहाली । दुष्काळाची आक्का शिरली
चिंतेची ती व्याधी जडली । वैराग्याची वृत्ति खिळली
नैराश्याची पोळी पिकली । त्यांतुनि आशा जन्मा आली
दिव्यत्वाचें तेज फांकलें । उत्साहाचें भरतें आलें
आत्मत्वाचें ज्ञान जाहलें । गतऐश्वर्यें नेत्र उघडिले
कारंजाचा अर्थ समजला । मनामधें तो पूर्ण बिंबला
" स्वावलंबन जगतीं जीवन । परावलंबन अवमानीन "
या वृत्तीनें तरूण भरला । स्वातंत्र्याच्या सन्निध आला

मुंबई —वि. ह. देशपांडे, बी. ए.

---

## तोरणगड !

( हा इतिहासप्रसिद्ध किल्ला भोरचे श्रीमंत पंतसचिव यांचे ताब्यांत असून, ह्याला सांप्रत " प्रचंडगड " या नांवानें संबोधिलें जातें. )

[ पादाकुलक वृत्त ]

शिरकोलींच्या राईमधुनी
शिरकाईचें दर्शन घेउनि
विजापूरच्या पाच्छाईला

शह द्याया शिवराय निघाला
मराठमोळे मावळभाई
खंदे भालाईत शिपाई
कडेकपारी तुडवित येती
तोरणगड झणिं चढून जाती
हां हां म्हणतां करुनी गिल्ला
शिवरायें सर केला किल्ला
स्वातंत्र्याच्या बांधि तोरणा
शुभ शकुनिं जिथें तो शिवराणा
तोरणगडिं त्या काय दिसे हें ?
घो घो वारा घुमतो आहे ! !

२

स्वातंत्र्याच्या उभवि निशाणा
निजकरिं येथें तो शिवराणा
बिरवाडीचा सिंह उसळुनी
म्लेंच्छांवरती येइ धांवुनि
त्या झेंड्याला करीत मुजरा
इथेंच तानाजी मालुसरा !
मस्त हत्तिशीं करीत कुस्ती
बांक्या बुरुजाची ती छाती
त्या झेंड्याला करी कुर्निसा
इथेंच कंक कुलींचा येसा !
धांवत जाई बाजि फसल्कर
दरी दरींतुनि बेदरकार !

थय थय नाचे तो नेताजी
दौड चहू मुलखांत बाहिर्जी !
तोरणगडिं त्या काय दिसे हें ?
घो घो वारा घुमतो आहे ! !

३

" धर्मासाठीं मानासाठीं
महाराष्ट्र स्वातंत्र्यासाठीं
हिंदुपदपाच्छाई खातर
उभवा कर्तृत्वाचे डोंगर
बीजाचे अस्सल जातीच्या
घ्याच मराठे भाले बर्च्या
अन्यायाला पायीं तुडवा
न्याय नीतिचे इमले चढवा
' हर हर ' गर्जुनि चला चला वर
मारूं मरूं वा करुनी संगर !
माय भवानी ही जातिनिशीं
उभी वीर हो ! बघा पाठिशीं "
स्फुरवी श्रीशिव शुभमंत्रा या
सह्याद्रीच्या शुभशिखरीं या
तोरणगडिं त्या काय दिसे हें ?
घो घो वारा घुमतो आहे ! ! !

वेळें, ( प्रचंडगड )
संस्थान भोर.

विपिनविहारी.

---

# मावळे !

( शार्दूल विक्रीडित )

ज्यांचा तो इतिहास भव्य तळपे व्यापूनि दाही दिशा ।
शौर्यस्तंभसमान दुर्गतति ती वानी यदीया यशां ।
त्या वीरश्रुतिमंगल प्रतिपदीं ज्यांच्या कथा रम्यशा ।
आतां हाय ! असह्य काय बनली त्या मावळ्यांची दशा ॥ १ ॥
शौर्याचा जगिं मूर्तिमंत भगवा झेंडा जिहीं रोविला ।
आर्यावर्त विभाग विक्रमभरें सारा जिहीं व्यापिला ।
ज्यांच्या दीपित भल्लपंक्ति बघतां शत्रुप्रभा मावळे ।
ते हे कालवशें सुदीन सगळे झाले कसे मावळे ? ॥ २ ॥
शत्रूच्या हृदयावरी करुनियां वीराग्रणी तांडवां ।
राष्ट्राच्या हितसाधनीं नवनवां जे जोडिती वैभवां ।
हस्तीं अर्ज विनंतिरूप धरुनी ते आज तें मागती ! ।
मर्माघातक याहुनी वद दुजी बापा ! कुवस्तुस्थिति ! ॥ ३ ॥
भाला घेउनियां करीं, कटितटीं तो जंबिया खोंवुनी ।
अश्वारूढ अहर्निश भ्रमति जे राष्ट्रार्थ रानीं वनीं ।
आतां ज्यां गिरणींतुनी परततां मार्गीं रवी मावळे ।
पोटामागुति धांवती निशिदिनीं ! हे तेच कां मावळे ? ॥ ४ ॥
राजा छत्रपती अतुल्य जगतीं नेता जयांचा रणीं ।
आज्ञा त्या प्रभुची प्रमाण गणती जे प्राणही अर्पुनी ।
आतां नेतृविहीन राष्ट्रभरणीं ज्यांची मती ना वळे ।
स्वत्वां सोडुनि भेदमार्गीं सजले, ते हेच कां मावळे ? ॥ ५ ॥
ज्यांच्या दिव्य पराक्रमें भुजबलें गोब्राह्मणां रक्षिलें ।
ते हे ब्राह्मण-ब्राह्मणेतर अशा वादींच हा ! गुंतले ।

आहे हेंच असो कसेंहि, परि हे आधार राष्ट्रां भले ।
उन्मार्गीं झटले तरी बुधवरें यां पाहिजे रक्षिलें ॥ ६ ॥
आशीर्वाद मदीय मंगल तुला बा ! मावळ्याच्या मुला ! ।
पूर्वीं हा तव पूर्वजांस सुभगा ! मत्पूर्वजांहीं दिला !
हा ! वर्णाश्रम धर्म विस्खलितता ! कोणी रडावें कुणां ? ।
मीं या काठिंय रडोनि आज रडवीं साऱ्या रसज्ञां जनां ॥ ७ ॥

नाडसूर

—मा. ना. आचार्य.

---

# रणरागिणी.

( धमार. )

एकदां रणरागिणी सह्याद्रि सारा गर्जवी
नाद तो दिङ्मंडलीं घुमुनी पुन्हां गगनीं उठे ॥ धृ० ॥
गीतमय चैतन्य तें अणुरेणुमधुनी संचरे
ती कुठें रणरागिणी ? चैतन्य तेंहि तिचें कुठें ? ॥ १ ॥
रुद्रवीणा गवसणींतचि नादहीनहि आजला
कांचमंजूषेमधें रणरागिणी पुतळी नटे
कार्णी त्या घुमती न ताना गोडशा अमृताहुनी
देह हा दिसतो इथें आत्मा तिचा विहरे कुठें ? ॥ २ ॥
पूर्वींचे दिन आजला मेल्याहुनी मेले जसे
पूर्वींचे तें शौर्यशाली भाग्यही हो हिंपुटें
तेंवि त्या हृदया जयांनीं कवळिलें रविमंडला
कीर्तिची नाडी उडे वा स्तब्ध जाणिव ही कुठें ? ॥ ३ ॥

वीर ते सह्याद्रिचे वीरांगना सौदामिनी
यांसवें रणरागिणीचा यापुढें ध्वनि हो कुठें ?
गवसणीचे गवसणींतचि तार वीण्याची तुटे
" भग्न हो रणरागिणी " रजनीस ही वाणी फुटे ॥ ४ ॥
हो कचित् सह्याद्रिची ती मुक्ति आतां जागृता
जागृतीची खूण चमके ओज मधुनी गोमटें
" मानभंग नको " ह्मणे हवि दे कुणी हृदय स्वतां
या " वसन्तविहार " कवनीं रागिणी जणु ती उठे ॥ ५ ॥
दादर ५-११-२४ —वसंतविहार

---

# माझें गाणें.

( आनंदी आनंद )

गाणें गाया मज कथितां । लिहा एक म्हणतां कविता ॥
कसलें गावें गान परी । ना मज कवनीं माधुरी ॥ १ ॥
गाणें माझ्या प्रीतीचें । गावें डफ खड्गावरचें ॥
वीर रुद्र तें आलाप । गात बसावें शतकल्प ॥ २ ॥
ताल ताल धरि तलवार । सतारिचें वादन मधुर ॥
धडड धडड तें तोफ करी । तबल्याचा ठेका भारी ॥ ३ ॥
गान रंग रंगीं जमला । वीररंग चित्तीं भरला ॥
भेरींचे सुर भरतात । तंबोरा देई साथ ॥ ४ ॥
अग्निनालिका उडतात । फैर नौबदी झडतात ॥
रंग असा भरला गानीं । राग भैरवी कल्पूनी ॥ ५ ॥

मालकंस गातां राग । हृदयीं भरला उन्माद ॥
वाटे आला गोविंद । कंसाचा करणार वध ॥ ६ ॥
भीमपलासा गा म्हणत । बीनाची देतो साथ ॥
मज वाटे येतो भीम । दुःशासनवध कल्पून ॥ ७ ॥
गीत सुरेलें मज ठावें । ऐकुनि ज्या वेडें व्हावें ॥
मुरली हरिनें वाजविली । रागदारि मोहक भरली ॥ ८ ॥
सुरेल पावा नादविला । हरिला तैं रणमद चढला ॥
पार्था हा व्यामोह तुला । ऐक जरा मन्मुरलीला ॥ ९ ॥
गीता-गायन हरि गाला । राधेचा मुरलीवाला ॥
आत्मगान चित्तीं भरलें । योगसमाधीं मन रमलें ॥ १० ॥
गाता ऐसें तरि बोला । लिहितों मग मधु कवनाला ॥
नानाविध रस ऐकाल । ऐकुनि त्या तन्मय व्हाल ॥ ११ ॥
रुद्रविणेचा झंकार । समरगान तैं होणार ॥
खड्ग तोफ भाला सजला । "महादेव हर हर बोला" ॥ १२ ॥
अशा विचारें । मन उल्हसलें ।
वृत्तिमयूरहि नाच करि । गानीं रस भरला भारी ॥ १३ ॥

मुंबई.

—कुमुद.

---

# बेडी.

( आनंदी आनंद. )

बेडी माझी मौजेची । लोहाची कां सोन्याची ॥
खुळखुळ मंजुळ वाजतसे । मी त्या नादें डोलतसें ॥ १ ॥

मंजुळ मंजुळ नाद तुझा । ध्वनी उमटला पुनः पुन्हां ॥
दुर्‍यादुर्‍यांतुनि पडसाद । हृदाहृदांतुनि आनंद ॥ २ ॥
बोल मुग्ध तव ऐकूनी । आनंदें मी डुलत मनीं ॥
काय बोलसी जाणतसें । कुजबुजलें जणुं बुलबुलसें ॥ ३ ॥
बोल पांखरा बोल जरा । तवगानाचा नाद बरा ॥
नाच मयूरा स्वानंदें । बोल कोकिले स्वच्छंदें ॥ ४ ॥
विवासनीं हे नेति मला । गोड पिंजरा तुला भला ॥
समदुःखी कां आनंदी । ठरेल पुढती परी तधीं ॥ ५ ॥
जातों मी मद्देशाच्या । बंधमोचना परक्याच्या ॥
तुला जसें कुणि कोंडियलें । मलाहि तैसें बांधियलें ॥ ६ ॥
तुझ्या गुणावरि अनुलब्ध । वा गानानें कुणि डुलत ॥
बहु सद्गुण दोषार्ह ठरे । निर्भयता पाखरां नुरे ॥ ७ ॥
मीही तैसा करि बोल । मद्देशाचा बुलबुल ॥
नाच नाचतो स्वैर पहा । बोल बोलतो तीच तऱ्हा ॥ ८ ॥
स्वातंत्र्यातें लक्षूनी । परदास्यातें वेधूनी ॥
चित्तमयूरहि नाचतसे । वृत्तिपाखरुं नादतसे ॥ ९ ॥
तरिच पाखरा तूं नी मी । कारानंदा उपभोगी ॥
त्वत्पायातें घुंगुरसे । बेडी मजला रिझवितसे ॥ १० ॥
उंच उंच ते उत्तुंग । महत्पदाचा आनंद ।
गड्या विहंगा चल चतुरा । बोलत नाचत मन्मयुरा ॥ ११ ॥
बेडी माझी मज वदली । भिऊं नको बंधनकालीं ॥
उंच भराऱ्या घेच सदा । भुलूं नको त्या महत्पदा ॥ १२ ॥

पुणें.

—कुमुद.

# शियांगचा बंदिवान !

( बायरन कवीच्या Prisoner of chillon या काव्याच्या ' शियांगचा बंदिवान ' ह्मणून केलेल्या रूपांतरांतील एक उतारा )

[ दिंडी ]

भव्य कारागृह भासते धरा ही
मला, जेथें संतान जनक नाहीं;
नसति दायादहि, दुःखभाङ् न कोणी
बरे ! नातरि तद्ध्यास वेड आणी ॥ १ ॥
असे उत्सुक परि गजाचे झराकीं
चढुन आणावे परत दृष्टि-रोखीं
पर्वतांना, जे असति अती उंच
अचल दृष्टिस त परम सुखद नाच ॥ २ ॥
हिमाच्छादित ते सतत उंच देशीं
दीर्घ आयत कासार पायथ्याशीं
पाहिलें मी त्या, बदल नसे तेथ
जसा झाला मम बाह्य आकृतींत ॥ ३ ॥
दुथडि वाहे ही नीलवर्ण ऱ्होन
तास पडलेले खडक, झुडुप-छिन्न
उडति उफळति उंच त्यावरून
ओघ; त्यांचा तो नाद भरी कान ॥ ४ ॥
शुभ्र भिंतीचें दूर नगर पाहीं
चपल नावांचीं शुभ्रतर-शिडें ही
दिसे सामोरें बेट एक सान
खिन्न चित्ता आनंद-एक-स्थान ॥ ५ ॥

असें मरकत तें सानसेंच बेट
अंधकूपा इतुकेंच रुंद स्पष्ट
उंच झाडें परि तीन असति त्यांत
तिथें वाहे तो मंद शेलवात ॥ ६ ॥

सलिल सरितेचें सभोंवार वाहे
सुरभि उदयोन्मुख सुमन उमलताहे
मत्स्य कोटाचे निकट विहरतात
दिसति सारे ते पूर्ण उल्हसीत ॥ ७ ॥

प्रभंजन ते सुटतात, पक्षिराज
होत आरुढ त्यांवरी जवें आज
अशा वेगें मज तो कधींही
पूर्वि आकाशीं उडालाच नाहीं ॥ ८ ॥

बघुनि सस्मित सृष्टिला नेत्रवाटें
फिरुन अधिकच मज अश्रुपूर लोटे
खिन्न होईं मी सुखें परत इच्छीं—
शृंखला-बंधन; नको मुक्ततांची ॥ ९ ॥

उतरल्यावर अंधार भूयाराचा
पडे दुर्वह मम शिरीं भार साचा
खोदलेली ही नविन जणूं खांच
मिटे जीवावर, झटूं यदर्थीच ॥ १० ॥

परी माझे जे नेत्र त्रासलेले
तयांना हें विश्रांतिस्थान झालें
दिवस गेले किती मास वरूषेंहि
गणि न त्यांना मी लक्ष मुळें न देईं ॥ ११ ॥

सुखाची तर मज नसे मुळीं आशा
न मी इच्छीं म्हणुनियां तिमिर-नाशा

मुक्त करण्या पातले शेवटीं ते
विचारीं मी नच " कुठें ? कां ? " तयातें ॥ १२ ॥

शृंखला बंधन अबंधन समान
जडे प्रीती मम निराशींच जाण
अंधकूपांतुनि मुक्त मला केलें
पूर्ण परिचित भूयार सनीं आलें ॥ १३ ॥

गमे आश्रम वा गृहहि मालकीचें
बळें त्यांतुनि काढण्या येति साचे
कोळियाशीं मी सख्य असें केलें
मूक त्यांचें तें क्रौर्य देखियेलें ॥ १४ ॥

चंद्रकिरणीं क्रीडती मूषकें हीं
नसावी कां मम मनोवृत्ति तीही ?
एक ठायींच सकल असों वासी
चक्रवर्तीहि मीच हो तयाशीं ॥ १५ ॥

नवल हें जरि मी शक्त त्या वधाया
गुण्या गोविंद बसूं एक ठाया
प्रीति जडली मम शृंखलेवरीही
सखी जीवाची मला होय तीही ॥ १६ ॥

सतत सहवासें शील बने त्यांतें
बंदिवासाहुनि मुक्ति दुःख देते
स्वतंत्रतेचा अचल मीहि भोक्ता
परी झाली मम तीच दशा आतां ॥ १७ ॥

जईं सेवी स्वातंत्र्य सौख्यदायी
दीर्घ सोडी निःश्वास एक मीहि ॥

मुंबई.

—वि० ह० देशपांडे, बी. ए.

---

# पंजरस्थ वनराजास—

देवाचा हा दुर्धर फेरा तद्भाग्या आला—
वनराज कसा शांतपणानें पंजरांत बसला !
भयद ध्वनीनें प्रदेश सारा ज्याच्या दणकावा—
बिनमोलाच्या पंजरींच तो येउन बैसावा ?
श्वापदगण ज्या अखिल थरारे पळतो चहुंवाटा !
श्वानांच्या त्या कशा लागती ऐकाव्या चेष्टा
मृगादिकां तुडवुनी करींची शिकार जो खाई—
उपवासाचें नको पुण्य हें ! ऐसें त्या होइ !
एकचि शब्दें मत्त गजांची मान वांकवावी—
अति मत्तांची मदरस प्राशुनि गर्दन उडवावी !—
तोच केसरी ! तो वनराजा ! चलनाविण बसला—
विधिचक्राचा पहात फेरा शोकमग्न झाला !
शृगाल जेजे उच्छिष्टातें केसरिच्या खाता—
ते ठक आपत्कालीं मोठें कोल्हेकुइ करिती !
असिधाराव्रत स्वतंत्रतेचें ज्यानें पाळावें—
अन्नाचे कण क्षुल्लक त्यानें कैसे चाखावे ?
मेघगर्जनेला जो लाजवि गिरिवरि गर्जून—
स्वस्थ रहावें काय तयें उच्छ्वासां सोडून ?
वनराजा बा ! लोखंडाचे गज कोंडिति तुजला—
नव्हेत गज हे !—दुर्दैवाचा घाला हा पडला !
स्वातंत्र्याचे खेळ खेळुनी जो वर्ते स्वैर—
पारतंत्र्यकर्दमीं रुते तो ! विधिची ही खैर ! !
स्वतंत्रतेमधिं राहुनि कोणा पारतंत्र्य येणें—
वरें वाटतें मेल्याहुनहि मेलेंसें होणें ! !

मान कीर्तिधन शौर्य अतुलहि व्यर्थचि तें जाई !
दास्याच्या नामर्दपणांतचि तदंत कीं होई !!
स्वातंत्र्याचें दास्य होतसे परि उलटें पुन्हां—
नाभीभंवतीं चक्रासमतें—विधिनियमचि कीं हा !
नैराश्याच्या कड्या वरुनियां मानव जरि पडला—
यत्न जो करी आशा जो धरि अंतीं तोच टिकला !! ॥ ९ ॥

माहीम. ना० पां० फडके, बी. ए. ( नॅशनल ).

---

# कालमहिमा !

सर्वस्वा लुटुनी करूनि धनिकें आम्हांसि निष्कांचन
नेला हो फिरवीत सर्वहि घरांदारांवरी नांगर
तगें जीवन–नाथ पोट भरण्या ते थेट मुंबापुरी—
गेले; लेंकुरवाळि मी झुरतसें हा ! हाय ! रात्रंदिन ॥ १ ॥
गेला मास कुठें अजून न पुरा वैशाख तों सोनुलें
तापानें अति होय विव्हळ तशी मीही ज्वरें पोळते
घालाया मुखिं कोणिही तरवणी नाहीं घरीं एकटें –
रोगांसंगति कीं जणूं विहरण्या दारिद्र्य हें राहिलें ॥ २ ॥
गेला राजस बाळ काळ–वदनीं हारे यमा निष्ठुरा ?
नाहीं पाहवला तुला अहह ! हे मत्प्राण आले गळां
तूतें अंतरलेंचि, दर्शन कधीं देशील प्राणेश्वरा ?
येते—बोलुनि निर्गतासु पडतां तो जीव उद्धारला ॥ ३ ॥
कोणा हासविशी कुणा रडविशी तूं नित्य कालेश्वरा ?
आहे त्वन्महिमा अगाध जगतीं नाहीं तुला तूजला ?

सांगवी. —कृष्णसुमंत.

---

# विधुविलास.

येई अंबरिं प्रेमपूर्ण हृदये हा यामिनी—वल्लभ
वर्षोनी करपीयुषा धवलिता सारी करी मेदिनी
होई हर्ष-निमग्न जों वसुमती तों सागरीं सुप्रभ—
पावोनी सुविकास ती कुमुदिनी आल्हादलीसे मनीं
झाली आतुर पंचबाण हृदयीं क्रीडा करी निस्तुला
तीतेंही सुखवोनियां उडु-पती आनंदवी यामिनी
काठें ती रिझते न तोंच गगनीं तारावली येउनी
घेई खेंचुनि मोहनास्त्रि रमणा यत्कांति दिव्योज्वला
ती तारावलि, यामिनी, कुमुदिनी अन् मेदिनी सोडुनी
जाई प्रेमभरें पुढें द्रुतगती तों पश्चिमा-भामिनी
सोडोनी कमनीय दृक्शर झणीं चंद्रास संमोहवी
प्रेमाचा सुविलास हा निरखुनी निश्वास सोडी कवी
निश्वासीं निघतो ध्वनी-रमसि तूं चंद्रा मुदें अंबरीं
वाहे प्रेम रसौघ दर्शनिं परी मत् रोमरोमांतरीं

पणदरें. —कृष्ण सुमंत.

---

# कालेंच ये नम्रता !

गेलें शैशव मूर्तिमंत वसते जेथें सुखाची खनी
गेलें सौष्ठव, माधुरी, सरलता, अव्याज वाचा तशी
गेलें मार्दव साहतें किमपि जें नैष्ठूर्य ना मानसीं
गेलें दैवत शैशवीं वसतसे मांगल्य जें कां जनीं ॥ १ ॥

झालों थोर मनांत स्वार्थ शिरला येई तया मागुनी
जें जें सुंदर पाहिजेच मजला--हव्यास हा तेधवां
सारासारविचार सोडुनि जना तोडूनहि बांधवां
स्वच्छंदा पुरवीन, मी अति अहंकारेंचि वाटे मनीं ॥ २ ॥

झाले भग्न पुरे मनोरथ तशी चित्तास ये म्लानता
झाली जीर्ण तनू, न लेश उरला उत्साह मर्यादित
आशा, लोभ, तशी अहंकृति मनीं, तारुण्य, हीं नाचत
धुंदी तोंवरि मानवी न उतरे, कालेंच ये नम्रता ॥ ३ ॥

जें जें सांगितलें जनीं अनुभवी, तें तें अतां आठवें
गेला काल फिरून ये न कितिही पस्तावलों यापुढें

मुंबई —वि. ह. देशपांडे, बी. ए.

---

# बालपणची एक मौज !

( बालानन्द )

१

बालपणीं एके दिवशीं
गंमत झाली बहु खाशी
स्मरण तयाचें होतांच
हृदयीं सौख्याचे नाच
अजुनीहि ते सुखवीति
क्षणभर चित्ता भुलविती
बालपणींचें सुख आतां
येइल कां वद तें हातां ?

बालपणींच्या
शुद्ध जिवाच्या
बहु मौजेच्या
असती गोष्टी किती तरी
कथितों त्यांतिल एक परी

२

दादा वारंवार वदे
आमचे प्रोफेसर साधे

साधें धोतर पायें जोडा
समजेना आपणासि बडा
परंतु प्रोफेसर एक
सुंदर करिती पोषाख
बूट, प्यॉंट, काठी हातीं
झिरमिळिची पगडी वरतीं
पुस्तक हातीं
मान ताठ ती
बघे न भवतीं
झरझर चाले ऐटानें
प्रोफेसरीच्या डौलानें

३

वर्णन सारें ऐकोनि
निश्चय केला एक मनीं
तसल्या पोषाका करुनी
क्षणांत प्रोफेसर बनुनी
दाखवीन मग सकलांना
नानापरिच्या मौजांना
'यस नो' इंग्रजि बोलेन
तरतर तैसा चालेन
पुसेल कोणी
त्यास अडाणी
ठरवूनि झणीं
पुढें चालता होईन
ऐटीनें बघतील जन

४

विचार उर्मी किति उठती
चित्त-सागरीं खळबळती
त्यांतुनि मग सावध झालों
भानावर पुरता आलों
करूं म्हणे कपडे आतां
प्रोफेसरिची सार्थकता
प्रोफेसर बनण्या उठलों
धांवत माडीवर गेलों
कपडे केले
सर्व जहालें
तों मनिं आलें
पगडि कुठें परि झिरमिळिची
पडली पंचाइत साची !

५

बावरलों क्षण एक जरी
युक्ती नामी सुचे परी
खोली बाबांची उघडी
असतां मिळेल तयिं पगडी
तों दिसली उघडी खोली
वृत्ति अती हर्षित झाली
पहात मग इकडे तिकडे
हळूच गेलों खोलिकडे
आंत जाउनी

कडी लाउनी
पगडि घेउनी
झोंकदार शिरिं ठेवूनी
पाहिं आरसा घेऊनी

६

ओहो ! किति सुंदर दिसतों!
धन्य ! धन्य ! माझा मी तो
विचार ऐसा येइ मना
विस्मरलों अखिला भाना

वृत्ति जाहली गुंग अती
भाझी मज पडली भ्रांती
माझें प्रतिबिंबाचि दिसलें
परि गमलें 'बाबा' आले
लाज लाजलों
अती शरमलों
पुरता थिजलों
काय करावें समजेना
कुणीकडेही बघवेना

७

घामानें अवघा भिजलों श्रम नसतां वाटे थकलों
थरथर कांपे भीतीनें टकटक पाही शून्य-मनें
नंतर भानावर आलों पुनरपि 'माझा मी' दिसलों
बघतां सांगूं किती हंसलों 'उगिच मघाशीं मी फसलों'!
बाबा नाहीं
कोणी नाहीं
भ्रम तो होई
बालपणींची ती मौज "स्वानंदाचें साम्राज्य"

दादर-मुंबई —वनराज

# मुरली.

हरि वाजिव गीता-मुरली ।। धृ० ।।
मुरलीचा मंजुळ नाद ।
नादानें जग उन्माद ।
उन्मादें वृत्ति मम भरली ।। १ ।।
तव मुखिंचा ऐकुनि पावा ।
द्विजगण कां लुब्धच व्हावा !
धेनुंची वृत्ति बावरली ।। २ ।।
हे तरु गानानें खुलती ।
नव पल्लव मोदें डुलती ।
ही पुष्पलता कां हसली ।। ३ ।।
तुज ऐकुनि वाजवितांना ।
ज्ञानाच्या घेतां ताना ।
पुष्पें हीं ज्ञानें नटलीं ।। ४ ।।
पशु पक्षी पावन झाले ।
रत; कर्माचरणः स्याले ।
अज्ञान निशा मावळली ।। ५ ।।
परि भारतीं या जनता ही ।
कां सुप्त दिसे अजुनी ही ।
नैराश्य तिमरी निजली ।। ६ ।।
गोविंदा वाजवी पावा ।
मधुज्योत्स्ना उधळा देवा ।
स्वातंत्र्यें जनता नटवी । हरि ।। ७ ।।

पुणें, —कुमुद

# पञ्चदशी—

( श्लोक )

सदर्थ भाषांतर कां करी मी ।
नवेंच मी काव्य रचीन नामी ।
मी काय ऐसा इतरासमान ।
कवीश्वरांही लववीन मान ? ॥ १ ॥
मी कल्पना घे उसनी कुणाची ? ।
शब्दार्थ मी काय कुणास याची ? ।
वृत्ति स्वयंभू कवनीं मदीया ।
ऐसा बुधा ! दंभ न वाह वाया ॥ २ ॥
अगम्य या संसृतिचें निदान ।
अगम्य लीलाहि तदीय जाण ।
संबंध तैसा कृतिकारणांचा ।
त्या निश्चयें कोण वदेल साचा ॥ ३ ॥
माझाच मी हेंहि कसें म्हणावें ? ।
कां जन्मलों तेंहि कुणास ठावें ? ।
माझेंच मी बोलतसें असेंही ।
कसें कुणाला वदवेल पाही ॥ ४ ॥
नवीन कोणीच करी न कांहीं ।
चाले पुनर्वृत्ति सदैव बा ! ही ।
तो* सूर्य तो चंद्र तसाच धाता ।
निर्मी ! असें हें श्रुतिवाक्य ताता ! ॥ ५ ॥

---

* सूर्याचंद्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत्.

तेथें गड्या ! धन्य तुझी अहंता ।
तुझाच तू हा स्वयमेव कर्ता ।
तूं हेंच कां शोधुन पाहलस ।
भ्रमांत कैसा करिशी विलास ? ॥ ६ ॥

अगाध* त्या शब्द-महोदधीनें ।
सर्गीं महातत्त्व सजीव वातें ।
तदाश्रयें त्यास नमून वंदा रे ।
कृताथ होती कवीसह सारे ॥ ७ ॥

मती तुझी बिंदुसमा बुधा ! हा ।
सिंधूंतुनी त्याच सुजन्म घेई ।
संबंध बापा ! अवमानुनी हा ।
पापात्मिका कां धरितोस ईहा ? ॥ ८ ॥

स्फूर्ती तुला पूर्व कवीश्वरांहीं ।
कधीं नसे का दिधलीच कांहीं ? ।
काव्यांत ज्या योजिशि शब्दजाता ।
तूंची तयाचा वद काय धाता ? ॥ ९ ॥

श्रुत्यर्थ तो प्राकृतिं खेळवोनी ।
सदेह जो स्वर्ग चढे विमानीं ।
वदे सदा तो तुकयाहि आदरें ।
संतोक्तिचीं हीं वदतों सदुत्तरें ॥ १० ॥

कवींद्र तैसा गुरु कालिदास ।
नमीतसे† पूर्व कवीश्वरांस ।
तो काय होता वद बा ! त्वदून ? ।
कळेल याची सुजनांस खूण ॥ ११ ॥

* देवीं वाचमजनयंत देवाः. † अथवा कृतवाग्द्वारे वंशेऽस्मिन् पूर्वसूरिभिः.

धिःक्कार त्या काव्य सुसंस्कृतीला ।
जा वाढवी नित्य अहंकृतीला ।
उन्माद जेथें विलयास जावा ।
तेथेंच धिक् दंभ असा सजावा ? ॥ १२ ॥

सानंद चित्तें कवनें करावीं ।
परात्परा निर्वृति सांठवावी ।
मूलींच तेथें तिजला अपाय ।
दुर्भाग्य बा ! याहुनि अन्य काय ? ॥ १३ ॥

स्पष्टोक्ति ही लक्षुनि टोंचितां कुणां ।
मानाल तो शब्द मदीय हा उणा ।
मी नम्रभावें नति हा तया करी ।
पाहे बुधा शोधुनि सत्य अंतरीं ॥ १४ ॥

उत्पादिता नव्य नसे रसांचा ।
मी हा ऋणी पूर्व कवीश्वरांचा ।
आधार घेऊनि तदीप कांहीं ।
त्यांच्या पदीं पञ्चदशी वदे हीं ॥ १५ ॥

नाडसूर—

—मा. ना. आचार्य

---

## मुग्ध कवीस—

( चा. भूपाळीची )

किती मुग्धता दावायाची बोल मजसि कविवरा ! सख्यारे
गान गावुनी टाक गुंगवुनि रसरसली ही धरा !
यशोपताका गगनमंडलीं फडकवुनी कवि किती—
आजवरी बा गेले परिजन तुजला ना लक्षिती !

हीन मानसा गान आपले-दाविसि गुणगुणुनी
गानदेवता तयांतचीती आनंदें बसुनी !
मार डफावर थाप, तुणतुणें सांवरुनीयां धरीं
दैन्य घालवुनि मोद पसरुनी गानवृष्टितें करीं
गृहसौख्यासी होसि पारखा-परि आहे तें कुणा ?
रडतां रडतां मानव घेई गानाच्या ताना ! !
वसुंधरेचा स्वर्ग कराया कविचा अवतार—
उत्साहाची करणें वृद्धी हा कविव्यापार !
दुःखावेगें मुग्ध बैससी-गानारंभा करीं—
क्षणीं विहरशिल मोदसरोजीं चंचल भृंगापरी !
बघतो नांगरधारी कैसा घेत असे ताना
कवीश्वराच्या सत्कवनांहुनि मोल अधिक त्यांना !
असेल त्यांतचि रहावयाची वृत्ति सदा त्याची
विसरुनि दुःखापदा म्हणुनि तो गातो गीतांसी !
बघ बघ बा ! ती गुलाबकलिका मुग्ध दिसे आजी
स्वयें हांसुनी, हंसवुनि जगता-गळुनि जावयाची !
निःश्वसनासम कवन कवीसीं-गति जैसी निर्झरा—
सांठविशी कां मनःसरीं तें ? देई पथ त्या खरा !
कड्यांवरुनी उडुनि धडाधड खोल दरींत जाई—
दगडांशीं तो निर्झर खेळे, गाना खळ नाहीं !
करी सर्व तो जगतासाठीं—काय तया मिळतें ?
जीवन जीवन ग्रीष्म ऋतूंतचि सुकुनि मात्र जातें !
बोध यांतला मज सांगाया गीत नवें गाई—सख्यारे
तुझाच किंकर तुलाच विनती करि ही परिसावी ! !

माहीम ना. पां. फडके. बी. ए. ( नॅशनल )

# उद्धारक

( कटिबंधक )

जगीं जन्मती जीव कशाला ?
पटते जेव्हां खूण मनाला
पटल मनाचें पार विरतसे
जनतेसाठीं जीव झुरतसे
स्वार्थावरती सोडुनि पाणी देशोद्धारा करणारा ॥ १ ॥

जिथें तयाला दिसे विषमता
झटे कराया मधुरा समता
ऐक्यरूपता मिळणीं होतां
जीव घडवि तो दुजा विधाता
स्वातंत्र्याची सृष्टि घडविण्या परवशताबल हरणारा ॥ २ ॥

भारतगौरव पूर्वजविक्रम
इतिहासाशीं करि न अतिक्रम
धर्मावरती येतां घाला
त्याच घडीला वीर निघाला
धर्मासाठीं झगडुनि झगडे संकटसागर तरणारा ॥ ३ ॥

वर्णाश्रम जे चालति सारे
तया न त्याचें बाधक वारें
गांव एक जरि घरें निराळीं
देश एक बहु गांवें झालीं
अनेक जाती जरीहि देशी माळ तयांची करणारा ॥ ४ ॥

गर्वभरें इंद्रियतति रुसली
मग जीवाची गोष्टचि फसली
मुकला देहा मुकला लोका
केवळ कारण मग हो शोका
ऐक्य मित्र संजीवन देशा आत्मा देहीं नटणारा ॥ ५ ॥

कुमार्गगामी जन जे कोणी
चळवि तयांची सुपथा श्रेणी
देशासाठीं झटुनी आंगें
देशहिताच्या तत्त्वा सांगे
आग लावुनी देति जनीं जे त्यांचा ताप शमविणारा ॥ ६ ॥

जनसंघाचा भंग न करितां
ज्या ज्या गोष्टी येती करितां
त्या त्या करि निज देश रक्षितां
नेकसमाजीं ठेवुनि समता
अटकेपारहि भगवाझेंडा बाहुबलें फडकाविणारा ॥ ७ ॥

शुद्धविचार मनांत जयाचे
जातिकुलांचे भेद कशाचे
देश-धर्म-यांविण नच वार्ता
सुखवाया निज बंधुसि-आर्ता
दूषित वातावरणीं प्रेमें, सुधासिंचना करणारा ॥ ८ ॥

फुटणें तुटणें एक पळाचें
जडणें घडणें बहु काळाचें
घोळवि चित्तीं याच विचारा
दाखवि सर्वां देशोद्धारा
विनवि "वसन्तविहार" रसिकहो अर्थ नीट घ्या पटणारा ॥ ९ ॥

दादर १-३-२३ —वसंतविहार

# साद !

( साकीवृत्त )

राष्ट्रकवींनो ! ममर्जीवांनो ! रसज्ञकलिजांनो !
सरस्वतीच्या प्रियतनयांनो ! निसर्ग सखयांनो !
कल्याणप्रद गाणीगाया जीवांभावांनीं
या तर या व्हा पुढति आपुल्या ज्योतिपाजळूनी !
निजआत्म्याच्या ज्योतीच्या त्या दिव्य प्रकाशांत
पुढिल मार्ग चोखाळा अपुल्या राष्ट्रप्रीत्यर्थ !
ऐक्याचीं कुणि सुंदर चित्रें रेखा निजकलमीं
बंधुभावनेच्या-प्रेमाच्या सुरम्य रंगांनीं ?
भिडोत जाउनि जनतेच्या त्या खोल मृदुलहृदया
भावोद्दीपन करोत रंध्रोरंध्री खेळुनियां !
द्वैताचीं कुणि भडक रंगीं तीं भेसुरशीं चित्रें
रंगवा जयीं अखिल जनांची थरथरतिल गात्रें !
भूतकालिंच्या प्रदेशि दिसतिल जीं अनुभवरत्नें !
कवन कनक-कोंदणीं उचलुनि ठेवुनि द्या यत्नें !
भवितव्याच्या प्रवासास जाधिं निघाल कविराया
छाती ठोकपणें सांगा जें दिसेल त्या ठायां !
निज रसवंतींतून वाहुंद्या जातिवंत ओज
या व्हा सरसे मायभूमिची करावया बूज !
जिवंत वाणीनें घाला निजराष्ट्राला साद
दिग्दिगंतरीं दुमदुमेल कीं जीचा पडसाद !
राष्ट्राचा हा बंदा घाली साद सुकविवृंदा
राष्ट्रहिताचा धंदा माझा कुणि निंदावंदा !

—विहिन विहारी

# आत्मनिवेदन

( अभंग )

अज्ञानाचा पाया ! । वरी हा डोल्हारा ।
संसाराचा सारा । उभारिला ॥ १ ॥
माझा मीच आलों । कोठुन कळेना ।
तरी ब्रह्मज्ञाना । जनां सांगे ॥ २ ॥
काय हें कौतुक ! । काय तुझी माया ! ।
आतां गुरुराया । सोडवीं गा ! ॥ ३ ॥
अनंत जन्मीं चें । नाहिं मज भान ।
पुढची ही खूण । ध्यानीं नये ॥ ४ ॥
अनादि मी ऐसा । जगीं याच आहे ।
अनंतचि राहे । याच लोकीं ॥ ५ ॥
ऐशा या सभ्रमीं । विसरलों मूळ ।
माजविलें खूळ । संसाराचें ॥ ६ ॥
श्रुतिस्मृति मान्य । संसार वेगळा !
माझ्या या गोंधळा । पुसे कोण ? ॥ ७ ॥
आतां गुरुराया । तूंच हें आवरी ।
सेवका सांवरी । स्वामिराया ॥ ८ ॥
आतां कर्म धर्म । वाहीं तव पायीं ।
गुण दोष कांहीं । नसो मज ॥ ९ ॥
सबाह्य अंतरीं । तूंचि हा अनंत ।
सर्ग स्थिति अंत । जगाचा तूं ॥ १० ॥
मीपण नैवेद्य । तुज निवेदिला ।
पाहिजे भक्षिला । प्रीतीनें हा ॥ ११ ॥

दास म्हणे दत्ता ! गुरु वासुदेवा ।
वारि भेदभावा । होतिं मागें ॥ १२ ॥

नाडसूर. —मा. ना. आचार्य

# अंतीं एकच

बाल्यीं खेळुनि खेळ मी भुलविले सान्या रसज्ञा जनां
विद्या-वैभावें दंग राहुनि तसें संतोषवीलें मना ॥
चित्ताला स्मृति हालवूनि करितें आनंदिता ती; तरी ।
अंतीं एक तुझ्या पदांविण नसे आधार विश्रांतरीं ॥ १ ॥

ऐश्वर्यें भरल्या जगांत मजला कांहीं उणें ना दिसे ।
कांता कांचन याविणें सुख दुजें कोठेंहि वाटें नसे ॥
नाना यत्न करूनि तें मिळवुनी सौख्यांत लोळें जरी ।
अंतीं एक तुझ्या पदांविण नसे आधार विश्रांतरीं ॥ २ ॥

माता तात तसेंच बंधु भगिनी सौख्यार्थ ते माझिया ।
घेती कष्टवुनी अहर्निश किती येऊनि माझी दया ॥
त्यांच्या एक सदैव घोळत असे चित्तांत चिंता जरी ।
अंतीं एक तुझ्या पदांविण नसे आधार विश्रांतरीं ॥ ३ ॥

स्नेहें गुंतवुनी मनास भुलवी प्रीतीहि आहे खरी ।
लाधावें चिरकाल सौख्य म्हणुनी नाना उपाया करी ॥
केले शांतविण्या मनास प्रिय जें प्राणप्रियेनें जरी ।
अंतीं एक तुझ्या पदांविण नसे आधार विश्रांतरीं ॥ ४ ॥

मी मोठा गुणि थोर धीर म्हणुनी झालों जगन्मान्यही ।
प्रेमानें जनता मुदें जरि वदे ' झाला न ऐसा मही ' ॥
भूपेंही अति आदरें मज स्वयें सन्मानियेलें जरी ।
अंतीं एक तुझ्या पदांविण नसे आधार विश्रांतरीं ॥ ५ ॥

आनंदें जरि स्वैर वाहति नद्या त्या एक रत्नाकरा—।
पावोनी चिरकाल भोगिति सुखें आनंद सर्वेश्वरा ! ॥
गीतें तीं कुशलें रचूनि म्हणुनीं आनंद झाला जरी।
अंतीं एक तुझ्या पदांविण नसे आधार विश्वांतरीं ॥ ६ ॥

दादर मुंबई. वनराज.

---

## प्रणति

( कवींद्र रविंद्रनाथ टागोर यांच्या जगमान्य गीतांजलींतील १०३ गीतभाग )

[ शार्दूलविक्रीडित ]

गीतें सर्व मदीय एकवटुनी साऱ्या निराळ्या स्वरा
पावोनी लय एक शांतिमयशा सेवोत रत्नाकरा
नाना शैलपदें त्यजोनि सरिता एका अनंताप्रति
एका मत्प्रणति—स्वरूप गतिनें गीतें मिळावींत तीं ॥ १ ॥

दादर ५।८।२२ वसंतविहार

---


## संगीताचा दरबार.

श्रीसरस्वती, गायन वादन विद्यालय, प्रार्थनासमाजा-
समोर, गिरगांव मुंबई.

गायन, हार्मोनियम, व सर्व प्रकारच्या तंतुवाद्यांचें शिक्षण दिलें जातें. वाद्यें किफायतीनें विकत मिळतात व जुनीं दुरुस्त केलीं जातात.

लक्ष्मणराव ब. चव्हाण.
प्रिन्सिपाल, सरस्वती गा. वा. विद्यालय.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ, इंदूर, यांजकडून बक्षीस मिळालेलें

## काव्योदय ग्रंथमाला-किरण १ लें.

# पुष्प-वाटिका

श्री. महादेव हरी मोडक बी. ए. ( सुख आणि शांति; खडे तात्विक बोल इ. ग्रथांचे कर्ते ) मा. ना. आचार्य, वसंतविहार इ. प्रसिद्ध कवींच्या निवडक उत्कृष्ट कवितांचा संग्रह. किंमत ८ आणे ट. ख. निराळा. एक रुपाया प्रवेश फी भरून वर्गणीदार होणारास मालेचीं सर्व पुस्तकें पाऊणपट किंमतीस मिळतील.

## कांहीं अभिप्रायः—

श्री. विष्णु कृष्ण जोशी एम. ए. एस. टी. सी. प्रिन्सीपॉल जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादरः—" या पुष्पवाटिकेंतील विहार व तेथील मधुर पुष्पामोदसेवन यांनीं रसिक वाचकवृन्दभृंगाच्या स्वातंत्र्याच्या, नव-स्फूर्तीच्या व चैतन्याच्या सोज्वल वृत्ति फुलल्याखेरीज राहणार नाहींत."

रा. ब. दा. ग. पाध्ये एम. ए. जे. पी. कविमित्रमंडळ, दादर, ह्या रसिक व उत्साही सरस्वतीदेवीच्या सेवक संघामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या ' काव्योदय ग्रंथमालें'तील पुष्पवाटिका हें लहानसें पण मनोवेधक पुस्तक मी मोठ्या आनंदानें वाचलें. या पुस्तकांत ग्रथित केलेल्या कविता थोड्या पण त्या नव्या कवितांचें स्वरूप आदर्शवत् स्पष्ट व सांगोपांग दाखविणाऱ्या आहेत. नवे विषय, नव्या कल्पना, नवीं वृत्तें, शब्द व प्रबंधाविषयीं स्वैरपणा, विचार वैचित्र्य व तदंगभूत क्वचित् घडून येणारी असंदिग्धता, स्वाभिमान व स्वराष्ट्रभक्ति इत्यादि नवीन पिढींतील कवींच्या कृतींतील विशिष्ट गुण या सर्वांचे मासले या पुस्तकांतील कवितांत पहावयास सांपडतात. मासले आहेत ते उच्च कोटींतील आहेत. कांहीं कांहीं कविता फारच हृदयंगम आहेत."

श्री. का. ना. धारप बी. ए. एलएल. बी. हायकोर्ट वकील. ठाणें, काव्योदय ग्रंथमालेचें पहिलें किरण " पुष्पवाटिका " वाचून पाहिलें. शिशिरर्तूतील बालरवीच्या प्रथम किरणाप्रमाणेंच सदरहू किरण आल्हाद-दायक व स्फूर्तिदायक आहे. सदहु किरणानें फुलविलेली पुष्पवाटिकेंतील कांहीं पुष्पें खरोखरींच राष्ट्रदेवतेच्या चरणीं वाहण्यालायक अशीं उज्वल व पवित्र व सौगंधिक आहेत. मनःसंस्कृति व मनोरंजन यांजबरोबरच राष्ट्रो-द्धारार्थ देह झिजविण्याची स्फूर्ति मनाला देणारें वाङ्मय हेंच खरे राष्ट्रीय वाङ्मय होय. त्याही दृष्टीनें सदहु किरण अभिनंदनीयच आहेत. "

केसरीः—" या पुष्पवाटिकेंत कवि वसंतविहार, विपिनविहारी, कृष्ण-सुमंत, आचार्य, वनराज व मोडक यांचीं कवनें आलीं आहेत. पैकीं मराठ्यांचें ब्रीद, महाराष्ट्र शारदेस, स्वातंत्र्य संगीत, कोजागर हीं कवनें राष्ट्राभि-मानदर्शक व वीरश्रीयुक्त आहेत. ' नदाचें पद ' हें ब्रुक या कवितेइत-केंच रमणीय आहे. तसेंच दिलदानत, विरहाकुल यशोधरा, बाल्यांतील पूर्ण सौख्य, एकांतांतील खूण, या कविता चांगल्या आहेत. कर्मविराग ही कविता मोरोपंताच्या केकावलीच्या धर्तीवर असून उत्तम साधली आहे. एकंदरात पाहतां ही पुष्प-वाटिका कोणाहि काव्यप्रेमी वाचकास घटकाभर रमवील यांत शंका नाहीं. "

लोकमान्यः—"भारदस्त कल्पना हें या पुष्पवाटिकेचें स्वरूप असून कोणावरही निष्कारण हल्ले किंवा अचरट शृंगारिक कल्पना, यांचा यांत गंध-ही नाहीं. "

नवा काळः—" मराठ्यांचें ब्रीद, महाराष्ट्र शारदेस, स्वारीस गेल्यावर, कोजागर, स्वातंत्र्य संगीत, आजची स्वारी, या कवितांवरून मराठी कवितेला इंग्रजी काव्यांनीं लाविलेलें प्रणय वेड कमी होऊन वीरवृत्तीच्या आपल्या मूळ वळणावर येऊं लागल्याचें स्पष्ट दिसतें. "

सहविचार, बडोदें:—" या पुस्तकांत प्रसिद्ध महादेव हरि मोडक, वसंतविहार, मा. ना. आचार्य इ. कवींच्या निवडक कवितांचा संग्रह केलेला आहे. शुद्ध भाषाप्रयोग. पूर्णोपमा आणि प्रसाद या गुणांबद्दल उपर्युक्त कवीं-

चा विशेष लौकिक आहे. आणि त्यांच्या उत्तमोत्तम कविता यांत घेतलेल्या असल्यामुळें या तिन्ही गुणांच्या मधानें ही पुष्प-वाटिका डवरलेली आहे हें निराळें सांगणें नकोच. निरनिराळ्या रसांचें पोषण होऊन आबालवृद्धांस सारखीच आनंददायक होईल अशी कवितांची निवड केलेली असल्या कारणानें पुस्तक उपयुक्त आणि संग्राह्य झालें आहे. आजकाल काव्य कुसुमांचा वाङ्मयक्षेत्रांत सडा पडत आहे. पण क्षेत्राला स्वतःच्या सान्नि-ध्यानें सुगंधित करण्याऐवजीं क्षेत्राचा सुवास चोरल्याच्या आरोपास त्यांतील बहुतेक पात्र होतात. अशा वेळीं सुगंधानें दरवळणाऱ्या पुष्पवाटिकेचें कोण स्वागत करणार नाहीं ? "

"*Bombay Chronicle*"—"Dadar is fast becoming an educational and cultural centre in various .swa Some apsiring Marathi Poets have constructed themselves into a Society and have ventured to publish together the first volume of what may be called, modern Lyrics. To popularise modern poetry its an uphill work and we wish the Poets' Society asucess. Some of the poems in this volume–we rust–will live as long as the Marathi Language."

या शिवाय कवि ना. गं. लिमये बी. ए. एल. टी. कवि के. ल. टेंभुर्णी-कर, श्री. कृ. वा. चितळे बी. ए., श्री. वि. स. लिमगांवकर, ना. के. ओक वगैरे विद्वान रसिकांचे तसेंच मनोरंजन, विविध ज्ञानविसार, मराठी शिक्षक, महाराष्ट्र, वगैरे नियतकालिकांचे उत्कृष्ट अभिप्राय आहेत. पुस्तक अंतर्बाह्य सुंदर, पृष्ठें ७२. काव्योदय ग्रंथमाला किरण दुसरें "लताकुञ्ज" निवडक कवितासंग्रह किं. ८ आणे ट. ख. निराळा.

चिटणीसः—कविमित्र-मंडळ, दादर, मुंबई.

३२८७

# संगीताचा साक्षात्कार !

अर्थात्

## ललित वाद्यांचा अपूर्व संग्रह.

हार्मोनियम, ग्रामोफोन आदि सुमधुर वाद्यांचें
प्रसिद्ध दुकान.

येथें सर्व प्रकारच्या हात व पायपेट्या, ग्रामो-
फोन, प्लेटस, व त्यांस लागणारें सामान अतिशय
किफायत भावानें मिळतें. तसेंच पेट्या व फोनो
अगदीं नव्याप्रमाणें दुरुस्त करून दिले जातात.

कॅटलॉग मागवा. एक वेळचा अनुभव हेंच
प्रमाणपत्र.

प्रेमजी नरसै

र्मोनियम मेकर्स अँड रिपेअरर्स.

अनंत शिवाजी देसाईचा बंगला,

सँडहर्स्ट रोड, मुंबई.

REFBK-0003164
REFBK-0003164

# रोल्ड गोल्ड सोन्याचे काळे न होणारे दागिने

शर्टचीं बटणें रु. ३; चंद्रहार रु. ४; गोटजोडी रु. २।।; पाटल्या जोडी रु. २।।; वज्रटीक रु. ४; ठुशी रु. ७; सरी रु. ४; नथ मोत्यांची रु ५; आंगठी रु. १; सल्ल जोडी रु. १।।; बांगड्या जोडी रु. २।।; घड्याळाचा छेडा रु ३.

**केंस काळे करण्याचा साबण**—यानें केंस कांळे होऊन कायम रहातात. ३ डब्यांच्या बॉक्सला रु. १।।.

**इमिटेशन मोतीं**—हीं मोतीं हुबेहुब खऱ्याप्रमाणें असून, टिकाऊ व जड आहेत. नथीसाठीं ८५ मोत्यांचा सर रु. ३; कुड्यांसाठीं १०० मोत्यांचा सर रु. ४.

**मगनलाल के. आणि कं.**

अमृतवाडी, गिरगांव, मुंबई.





# आमचें नवें घड्याळ !

## रोल्ड गोल्ड रेल्वे (REGD)

घरपोंच व्ही. पी. सह

**चार रुपये चौदा आणे.**

गॅरंटी तीन वर्षें.

## लिचो वॉच कंपनी,

( *India* ) मुंबई नं. ४